अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

दैनिक

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १८८ । मंगळवार २१ एप्रिल २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com

## मानवी कल्याणाचा नि:शुल्क मार्ग



'सहजयोग'

भाग ३३

परमेश्वर ही बाजारात विकत मिळणारी वस्तू नाही आणि जो परमेश्वराचा खरा मार्ग दाखवतो, तो कधीही पैशाची मागणी करत नाही. १८ डिसेंबर १९७६ रोजी मुंबईतील भाषणात श्री माताजींनी हाच मोलाचा संदेश दिला होता. आजच्या काळात 'धर्मा'च्या नावाखाली होणारी लूट थांबवणे ही काळाची गरज आहे. जर कोणी अध्यात्मासाठी पैसे मागत असेल, तर तो मार्ग ईश्वराचा असूच शकत नाही.

शहरांच्या तुलनेत ग्रामीण भागातील आरोग्य उत्तम असण्याचे कारण म्हणजे तिथली शुद्ध हवा आणि लोकांची पवित्र मने. याच पावित्र्याला 'सहजयोग' शास्त्रीय बैठक देतो. सहजयोगाद्वारे जेव्हा तुमची सुप्त 'कुंडलिनी' शक्ती जागृत होते, तेव्हा तुम्हाला आत्मसाक्षात्कार प्राप्त होतो. ही प्रक्रिया एखाद्या बीजाच्या अंकुरण्याइतकीच नैसर्गिक आणि सहज आहे.

यासाठी कोणतीही शारीरिक मेहनत किंवा पैशांची गरज नसते. एकदा का तुम्ही या स्थितीत स्थिरावलात की, तुमचे शारीरिक आणि मानसिक आजार मुळापासून नाहीसे होतात. औषधे आणि डॉक्टरांवरील अवलंबित्व कमी होऊन जीवनात खऱ्या समाधानाचा उगम होतो. स्वतःमधील चैतन्याला जागृत करून निरामय जीवनाकडे वाटचाल करण्याचा हा एक विनामूल्य आणि राजमार्ग आहे.

## महत्त्वाचे..

### शेतजमिनीच्या वाटणीपत्रासाठी नोंदणी शुल्क माफी

मुंबई : शेतजमिनीच्या वाटणीपत्रावर आकारले जाणारे नोंदणी शुल्क माफ करण्याचा निर्णय राज्याच्या महसूल विभागाने घेतला आहे. या निर्णयामुळे वडिलोपार्जित जमीन वाटपाची प्रक्रिया सुलभ होणार आहे. त्यासंदर्भातील परिपत्रक महसूल विभागाकडून काढण्यात आले आहे. राज्य शानसाच्या यापूर्वीच्या अधिसूचनेनुसार, कलम ८५ अन्वये एकाच कुटुंबातील सदस्यांनी केलेल्या शेतजमिनीच्या वाटणीपत्रावर कोणतेही नोंदणी शुल्क आकारले जाणार नाही, अशी तरतूद करण्यात आली होती. या कलमांतर्गत वाटणीपत्राचे अधिकार तहसीलदारांना आहेत. मात्र, अनेक नागरिक तहसीलदारांकडे न जाता थेट दुय्यम निबंधक कार्यालयात आपसातील संमतीने वाटणीपत्र नोंदणीसाठी सादर करत होते. अशा वेळी मूळ अधिसूचनेत स्पष्ट तरतूद नसल्याचे कारण देत दुय्यम निबंधक कार्यालयांकडून नोंदणी शुल्क आकारले जात असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले होते. त्यानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयानुसार महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ८५ अंतर्गत येणाऱ्या प्रकरणांसह, आपसातील संमतीने थेट दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणीसाठी येणाऱ्या वडिलोपार्जित शेतजमिनीच्या वाटणीपत्रांनाही नोंदणी शुल्कातून पूर्णपणे माफी देण्यात आली आहे.

# विकासाचा 'बेअरर चेक' देऊन जातोय

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून कर्डिलेंच्या स्वप्नपूर्तीचे आश्वासन



### देवाभाऊ न्याय द्या...

**अक्षय कर्डीले यांच्यासाठी आयोजित सभेवेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना काही परीक्षार्थी उमेदवारांनी बॅनर दाखवले असून 'देवाभाऊ न्याय द्या', अशा आशयाचे बॅनर झळकवले. स्टेनोग्राफर (लघुलेखक) पदाच्या नोकरीसाठी प्रयत्नशील असलेल्या उमेदवारांनी हे बॅनर दाखवले असून भरती रखडल्याने मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यावर, तुमचे प्रश्न समजून घेऊन, मार्ग काढू असे आश्वासन मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. दरम्यान, तत्पूर्वी सभेत माजी खासदार सुजय विखे यांनीही तुमच्या प्रश्नासाठी तुम्हाला मुख्यमंत्री वेळ देतील असे म्हटले होते. 'मला तुमची पद्धत आवडली, लोकशाही पद्धतीने आपले म्हणणे मांडून, तुम्ही शांतपणे बसलात. मी तुमचे अभिनंदन करतो. तुमचे प्रश्न समजून घेऊन, मार्ग काढू', अशी प्रतिक्रिया भाषणादरम्यान मुख्यमंत्र्यांनी आंदोलकांना उद्देशून दिली.**

राजेंद्र परदेशी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले आणि माझे अत्यंत जिव्हाळ्याचे ऋणानुबंध होते. सलग सहा वेळा निवडून येणे ही सामान्य बाब नाही. कर्डिले साहेबांनी राहुरीच्या विकासासाठी पाहिलेली सर्व अपूर्ण स्वप्ने पूर्ण करण्याची जबाबदारी आता माझी आहे. ही कामे पूर्ण करण्यासाठी मी आज अक्षय कर्डिले याच्या रूपाने राहुरीच्या जनतेला विकासाचा 'बेअरर चेक' देऊन जात आहे, असे भावनिक आणि आश्वासक उद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

### दिग्गजांची फौज मैदानात

**पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी कर्डिले यांच्या कार्याचा लेखाजोखा मांडला, तर सुजय विखे पाटील आणि संग्राम जगताप यांच्या 'जोडगोळी'ने प्रचाराची धुरा सांभाळल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी त्यांचे विशेष कौतुक केले. या सभेला झालेली हजारोंची गर्दी आणि डॉ. बाबुराव तनपुरे कारखान्याचे अध्यक्ष अरुण तनपुरे यांनी मुख्यमंत्र्यांचा केलेला सत्कार, यामुळे राहुरीचे राजकीय समीकरण अक्षय कर्डिले यांच्या बाजूने झुकल्याची चर्चा आता सुरू झाली.**

राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीतील महायुतीचे उमेदवार अक्षय कर्डिले यांच्या प्रचारासाठी आयोजित भव्य जाहीर सभेत मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी व्यासपीठावर विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, मंत्री पंकजा मुंडे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी खासदार सुजय विखे पाटील, आमदार संग्राम जगताप, आमदार मोनिका राजळे यांसह अनेक दिग्गज नेते उपस्थित होते.

मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणात राहुरीच्या विकासाचा रोडमॅप मांडला. त्यांनी जाहीर केले की, राहुरीमध्ये एमआयडीसी स्थापन करून किमान ३५ हजार तरुणांना रोजगार उपलब्ध करून दिला जाईल. तसेच निळवंडे प्रकल्प, वांबोरी चारी आणि मुळा धरणातील गाळ काढण्याचे प्रश्न प्राधान्याने सोडवले जातील. कर्डिले साहेबांच्या धूर्त राजकारणाचा उल्लेख करताना मुख्यमंत्री म्हणाले, कर्डिले साहेब ज्याच्या मागे उभे राहत त्याला नेते बनवत, आणि जो आडवा येत त्याला 'झोपवण्याची' ताकदही त्या पैलवानामध्ये होती.

आपल्या भाषणादरम्यान अक्षय कर्डिले यांना वडिलांच्या आठवणीने गहीवरून आले. माझ्या वडिलांनी ३० वर्षे जनतेची सेवा केली. आज मतदारांमध्ये मला माझे वडील दिसत आहेत. त्यांनी जनतेवर जे प्रेम केले, त्याची परतफेड मी विकासाच्या माध्यमातून करेन, असा शब्द त्यांनी मतदारांना दिला.

### प्राजक्त तनपुरेंचा माघारीचा 'मोठेपणा', पण पक्षप्रवेशाचे प्रश्नचिन्ह!

दिवसभर जिल्ह्याचे लक्ष लागून राहिलेल्या प्राजक्त तनपुरे यांच्या भूमिकेवर मुख्यमंत्र्यांनी पडदा टाकला. मी प्राजक्त तनपुरे यांना फोन करून विनंती केली होती की कर्डिले साहेबांच्या सन्मानार्थ त्यांनी माघार घ्यावी. त्यांनी एका मिनिटात म इझ्या शब्दाला मान दिला, ही महाराष्ट्राची सुसंस्कृत राजकीय संस्कृती आहे, असे सांगत मुख्यमंत्र्यांनी त्यांचे जाहीर आभार मानले. मात्र, तनपुरे यांनी अर्ज मागे घेतला असला तरी त्यांनी व्यासपीठावर येणे टाळले. सायंकाळी विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी तनपुरे यांच्या निवासस्थानी जाऊन बंद दाराआड चर्चा केली होती, परंतु तनपुरे सभेत न आल्याने त्यांच्या भाजप प्रवेशाबाबतचा सस्पेन्स अद्याप कायम आहे.

# सरकारी कर्मचारी आजपासून बेमुदत संपावर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** विविध मागण्यांसाठी राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना आणि राज्य सरकारी गट-ड (चतुर्थ श्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाने आज मंगळवारपासून (दि. २१)पासून बेमुदत संपाची घोषणा केली आहे. त्यामुळे राज्यभरातील शासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

### शिस्तभंगाच्या कारवाईसह वेतन न देण्याचा सरकारचा इशारा

संपाच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाने परिपत्रक काढले असून त्यामध्ये सर्व मंत्रालयीन विभाग तसेच त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयांना उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्याचप्रमाणे संपकरी कर्मचाऱ्यांनाही शिस्तभंगाच्या कारवाईचा, तसेच संपकाळातील वेतन न देण्याचा इशारा दिला आहे.

परिपत्रकामध्ये म्हटले आहे की, शासकीय-निमशासकीय कर्मचाऱ्यांनी संपामध्ये सहभागी होणे, ही बाब गैरवर्तणूक समजण्यात येईल व अशा कर्मचा-यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, अशा प्रकारचे आदेश विनाविलंब निर्गमित करण्यात यावेत व ते सर्व कर्मचारी यांच्या व्यक्तीशः निदर्शनास आणावेत.

**विभाग प्रमुखांनी संप काळात आपले मुख्यालय सोडून जावू नये. तसेच या आदेशाच्या दिनांकापासून संप संपेपर्यंत कोणत्याही शासकीय कर्मचा-यास कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करु नये आणि जे कर्मचारी रजेवर असतील अशा प्रत्येक प्रकरणी विचार करुन त्यांची रजा रद्द करुन त्यांना कामावर तात्काळ बोलवावे किंवा कसे ते ठरवावे, असे आदेशही सरकारने दिले आहेत. शासकीय कर्मचा-यांच्या संपाबाबत केंद्र शासनाचे काम नाही वेतन नाही हे धोरण राज्य शासनही अनुसरत असल्याचे कर्मचा-यांना अवगत करावे, अशा सूचना सरकारने विभागप्रमुखांना दिल्या आहेत. त्यामुळे संपकाळातील वेतन न मिळण्याची टांगती तलवार संपकरी कर्मचाऱ्यांवर असणार आहे.**

कर्मचाऱ्यांनी संपात सहभागी न होता, नेहमीप्रमाणे कार्यालयात उपस्थित राहण्यासाठी त्यांचे मन चळविण्याचा प्रयत्न करावा. संप काळात कार्यालय नियमित वेळेवर उघडण्याची व बंद करण्याची योग्य ती व्यवस्था करावी व ती व्यवस्था जबाबदार अधिकारी यांचेकडे दयावी, आवश्यकता भासल्यास पोलीस दलाची मदत घेण्याची सूचना सरकारने सर्व विभागांना दिल्या आहेत.






स्व. अरुण (काका) जगताप

यांना प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त

विनम्र अभिवादन व भावपूर्ण श्रद्धांजली!

आपल्या कार्यातून समाजात निर्माण केलेला विश्वास आणि प्रत्येकाशी जपलेला जिव्हाळा यामुळेच ते सर्वांच्या मनात कायमचे स्थान निर्माण करून गेले. त्यांची साधी, प्रामाणिक आणि माणुसकीची वाटचाल नेहमीच सर्वांसाठी प्रेरणादायी राहील.

विनीत

डॉ. राधाकृष्ण विखे पाटील
जलसंपदा मंत्री (गोदावरी आणि कृष्णा खोरे विकास महामंडळ)
महाराष्ट्र राज्य, पालकमंत्री अहिल्यानगर

डॉ. सुजय विखे पाटील
प्रदेश उपाध्यक्ष भाजपा,महाराष्ट्र

# संपादकीय

## पवित्र पोर्टलच्या नावाखाली 'अपवित्र' राजकारण

महाराष्ट्राच्या शैक्षणिक नकाशावर सध्या एक विचित्र आणि चिंताजनक विरोधाभास उमटला आहे. एका बाजूला दुर्गम भागातील वाड्या-वस्त्यांवरील शाळा शिक्षकांअभावी कुलूपबंद होण्याच्या मार्गावर आहेत, तर दुसरीकडे राज्यातील तब्बल १९ हजार शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या तुलनेत शिक्षक अधिक असल्याचे वास्तव समोर आले आहे. या विसंगतीमुळे सुमारे ३० हजार शिक्षकांवर 'अतिरिक्त' ठरण्याची टांगती तलवार आहे. हा केवळ आकड्यांचा खेळ नसून, राज्याच्या सार्वजनिक शिक्षण व्यवस्थेच्या ढासळत्या बुरुजाचे लक्षण आहे. डॉ. दीपक पवार यांनी मांडलेले विश्लेषण या विदारक वास्तवावर नेमके बोट ठेवते: ही परिस्थिती नैसर्गिक नसून ती चुकीच्या सरकारी धोरणांचे आणि नियोजित दुर्लक्षाचे अपत्य आहे.

राज्यातील जिल्हा परिषद आणि अनुदानित शाळा एकेकाळी ग्रामीण भागातील गुणवत्तेचा कणा होत्या. मात्र, गेल्या दोन दशकांत सरकारी शाळांकडे पाहण्याचा शासनाचा दृष्टिकोन केवळ 'खर्च' असा राहिला आहे. ज्यावेळी या ३० हजार शिक्षकांच्या नियुक्त्या झाल्या, तेव्हा शाळांची पटसंख्या उत्तम होती. मग ही पटसंख्या का रोडावली? याचे उत्तर खाजगीकरणाच्या वाढत्या प्रभावात दडले आहे.

शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी करताना सरकारने केवळ भौतिक सुविधांकडे लक्ष दिले, परंतु गुणवत्तेच्या शर्यतीत सरकारी शाळांना खासगी इंग्रजी माध्यमाच्या आणि सीबीएसई शाळांच्या बरोबरीने उभे करण्यात शासन अपयशी ठरले. पालकांचा इंग्रजी माध्यमांकडे असलेला ओढा ओळखून सरकारी शाळांमध्ये 'सेमी-इंग्रजी' सारखे प्रयोग झाले, पण ते अर्धवट राहिले. परिणामी, ग्रामीण भागातील पालकांनीही पोटाला चिमटा काढून पाल्यांना खाजगी शाळांकडे वळवले, ज्याचा थेट फटका पटसंख्येला बसला.

कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करून 'समूह शाळा' सुरू करण्याचा सरकारचा निर्णय सध्या वादाच्या भोवऱ्यात आहे. डॉ. पवार म्हणतात त्याप्रमाणे, हा प्रयोग 'आत्मघातकी' ठरू शकतो. महाराष्ट्राची भौगोलिक रचना पाहता, दुर्गम भागात ३०-४० किमी अंतरावरील शाळेत मुलांनी जाणे व्यवहार्य नाही. विशेषतः मुलींच्या बाबतीत ही समस्या अधिक गंभीर आहे. खेड्यापाड्यातील मुलींना घराच्या उंबरठ्यावर शिक्षण उपलब्ध झाल्यामुळेच महाराष्ट्रात स्त्री शिक्षणाचे प्रमाण वाढले. आता शाळा दूर गेल्यावर सुरक्षिततेच्या कारणास्तव अनेक मुली शिक्षणाबाहेर फेकल्या जाण्याची भीती आहे.

रकार वाहतुकीसाठी बस देण्याचे आश्वासन देत असले, तरी एसटी महामंडळाची सद्यस्थिती आणि ग्रामीण भागातील रस्त्यांचे जाळे पाहता हा 'शाळा सोईची' पेक्षा 'शाळा जाईची' असाच प्रकार ठरेल. शिक्षण हे केवळ साक्षरता वाढवण्यासाठी नसते, तर ती गावाच्या सामाजिक संस्कृतीचा भाग असते. गावची शाळा बंद होणे म्हणजे त्या गावचे चैतन्य हरवणे होय.

या संकटात केवळ सरकारच दोषी नाही, तर शिक्षक संघटना आणि शिक्षकांची सोयीची भूमिकाही कारणीभूत आहे. अनेक शिक्षक राजकीय वशिल्याचा वापर करून शहरी किंवा निमशहरी भागात 'अतिरिक्त' असूनही टिकून राहतात. जिथे गरज आहे तिथे जाण्याऐवजी, सोयीच्या ठिकाणी नियुक्ती मिळवण्यासाठी होणारी धडपड शिक्षण व्यवस्थेला पोखरत आहे. शिक्षकांनी केवळ पगाराच्या तारखा आणि भत्त्यांचा विचार न करता, 'जिथे विद्यार्थी तिथे शिक्षक' हे तत्व स्वीकारणे गरजेचे आहे.

दुसरीकडे, शिक्षक भरतीसाठी सुरू केलेले 'पवित्र पोर्टल' हे नाव मिळाल्यापासून वादातच राहिले आहे. तंत्रज्ञानाचा वापर पारदर्शकतेसाठी व्हायला हवा, पण तांत्रिक त्रुटी आणि निर्णयातील दिरंगाईमुळे पात्र उमेदवारांमध्ये नैराश्य पसरले आहे. २२ एप्रिलपर्यंत सुरू राहणाऱ्या पटपडताळणी मोहिमेनंतर नक्की किती शिक्षक अतिरिक्त ठरणार, याचे चित्र स्पष्ट होईलच; पण या प्रक्रियेत शिक्षकांचे वेतन रोखणे हा अन्यायकारक मार्ग आहे. यामुळे शिक्षकांच्या मानसिकतेवर परिणाम होऊन त्याचा अंतिम फटका विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेलाच बसणार आहे.

महाराष्ट्राला जोतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांचा वारसा लाभला आहे, ज्यांनी बहुजनांच्या मुलांसाठी शिक्षणाची कवाडे उघडली. राजर्षी शाहू महाराजांनी प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे केले. मात्र, आजच्या काळात 'कॉर्पोरेट' धर्तीवर शिक्षण व्यवस्था चालवण्याच्या नादात आपण हा वारसा विसरत चाललो आहोत का?

१९६०-७० च्या दशकात महाराष्ट्रात शिक्षणाचा जो विस्तार झाला, तो ग्रामीण भागातील सामान्य मुलाला केंद्रस्थानी ठेवून झाला. आजचे 'क्लस्टर स्कूल' धोरण हे शहरीकरणाच्या मानसिकतेतून आलेले आहे. जर सरकारने अनुदानित शाळांमधील रिक्त पदे वेळेवर भरली असती आणि पायाभूत सुविधांकडे लक्ष दिले असते, तर आज ही 'अतिरिक्त' शिक्षकांची वेळ आली नसती.

राज्यातील सार्वजनिक शिक्षण वाचवायचे असेल, तर सरकार, शिक्षक संघटना आणि समाज यांनी एकत्रित येण्याची वेळ आली आहे. केवळ शाळा बंद करणे हा उपाय नसून, त्या शाळांची गुणवत्ता कशी वाढेल, यावर विचार व्हायला हवा.

अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन हे राजकीय दबावाखाली न होता, पारदर्शक पद्धतीने विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार व्हावे. सरकारी शाळांमध्ये केवळ खिचडी न वाटता, तिथे आधुनिक तंत्रज्ञान आणि दर्जेदार शिक्षण मिळेल याची खात्री शासनाने द्यावी. भौगोलिक अडथळे असलेल्या भागात समूह शाळांचा हट्ट न धरता, तिथे स्थानिक स्तरावरच शिक्षण कसे टिकेल, हे पाहिले पाहिजे.

जर आज आपण या ३० हजार शिक्षकांच्या भवितव्याचा आणि ओस पडणाऱ्या शाळांचा गांभीर्याने विचार केला नाही, तर येणाऱ्या काळात शिक्षण हे केवळ श्रीमंतांची मक्तेदारी ठरेल आणि गरिबांची मुले शिक्षणापासून वंचित राहतील. शिक्षण क्षेत्रातील हे 'मृगजळ' वेळीच ओळखून ठोस पावले उचलणे, हेच सुजाण महाराष्ट्राचे लक्षण ठरेल. अन्यथा, 'पवित्र' पोर्टलच्या नावाखाली अपवित्र राजकारणच शिक्षण व्यवस्थेचा घास घेईल.

## सात्रळमध्ये हल्ल्याच्या घटनेविरोधात नागरिकांचा निषेध; कारवाईची मागणी



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनगाव :** सात्रळ येथे व्यापाऱ्यावर झालेल्या हल्ल्याच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर पंचक्रोशीतील नागरिकांनी एकत्र येत शांततेच्या मार्गाने निषेध नोंदवला. सात्रळ ग्रुप सोसायटीसमोर आयोजित सभेत ग्रामस्थांनी संयम राखत, गावातील सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त केली तसेच दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली.

सभेत बोलताना नागरिकांनी या घटनेला दुर्दैवी म्हणत, अशा प्रकारच्या घटना गावाच्या सामाजिक वातावरणावर परिणाम करतात, असे मत व्यक्त केले. गावात सुरक्षित आणि शांत वातावरण राखणे ही सर्वांची जबाबदारी आहे. मतभेद असले तरी ते चर्चेतून सोडवले जावेत, असे मत यावेळी मांडण्यात आले.

काही वक्त्यांनी गावात वाढत चाललेल्या गुन्हेगारीच्या घटनांबाबत चिंता व्यक्त करत, प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची गरज अधोरेखित केली. वेळीच लक्ष दिल्यास अशा घटना टाळता येऊ शकतात. प्रशासन आणि नागरिकांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे मत सभेतून पुढे आले.

सभेत अवैध व्यवसायांचा मुद्दाही उपस्थित झाला. काही नागरिकांनी वाळू उपसा आणि इतर बेकायदेशीर व्यवहारांमुळे वातावरण बिघडत असल्याचे नमूद करत, संबंधित यंत्रणांनी यावर नियंत्रण ठेवावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. कायद्याची प्रभावी अंमलबजावणी झाली, तर गुन्हेगारीला आळा बसू शकतो, असेही सांगण्यात आले.

हल्ल्याशी संबंधित व्यक्तींवर तातडीने कारवाई करून योग्य ती कायदेशीर प्रक्रिया राबवावी, अशी एकमुखी मागणी करण्यात आली. कायद्यावरील विश्वास कायम राहणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे दोषींना शिक्षा होणे गरजेचे आहे, असे मत व्यक्त झाले.

या निषेध सभेला सात्रळ, सोनगाव, धानोरे परिसरातील ग्रामस्थ, युवक आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. नागरिकांनी शांततेत राहून गावातील सलोखा टिकवण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.

> घटनेनंतर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी सात्रळ येथे भेट देत परिस्थितीची माहिती घेतली. संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश दिल्याची माहिती मिळाली.

## संतांनी परमार्थातील शक्ती समाजाला दाखवून दिली : अर्जुनगिरी महाराज

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगांव :** भिंतीला चल, अन् रेड्याला बोल, तिरडीवरील सच्चिदानंद बाबाला ऊठ, म्हणून संत ज्ञानेश्वर महाराजा सारख्या महापुरूषांनी परमार्थातील शक्ती समाजाला दाखवून दिली असल्याचा उपदेश अर्जुनगिरी महाराज, शिंगी यांनी माळवाडगांव येथे सुरू असलेल्या पंचदिवशीय किर्तन महोत्सव सोहळा किर्तनातून भाविकांना उपदेश करताना केला.

श्रीरामपूर तालुक्यातील माळवाडगांव येथे भवानी देवी हनुमान मंदिर प्रांगणात उभारण्यात आलेल्या ७५ फुटी धर्मध्वज चौथ्या वर्धापन दिनानिमित्ताने सुरू असलेल्या किर्तन महोत्सव सोहळ्यात तिसरे किर्तनरूपी पुष्प अर्जुनगिरी महाराज'(नारायणगिरी महाराज आश्रम शिंगी) यांनी गुंफले



किर्तन प्रसंगी,धन्य ते संसारी दयावंत ते अंतरी या जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या चार चरणाचे अभंगावर भाविकासमोर निरूपण करताना महाराज पुढे म्हणाले की, संतांचा महिमा अन् संताचे कार्य या अभंगवाणीतून महाराज सांगतात.समाजा विषयी भूत दया मात्रा जोपासणारा एक वर्ग असून तो धन्य आहे.समाजाला सन्मार्गाला लावण्यासाठी आम्ही महापुरुष जन्माला आलो नाही तर आम्हाला भगवंताने पाठवले.संत ज्ञानेश्वर महाराजांनी योगीराज चांगदेव महाराजांच्या भेटीत चल म्हणून भिंत चालवली. पैठणच्या ब्राह्मणांनी आवाहन दिल्यानंतर रेड्याला बोल म्हणून मुखातून वेद बोलविले.सच्चिदानंदबाबांची प्रेतयात्रा निघालेली असताना, सच्चिदानंदाची पत्नी संत ज्ञानेश्वरांचे दर्शन घेत असताना सौभाग्यवती भव असा आशीर्वाद दिला. यावर सच्चिदानंदाची पत्नी म्हणाली त्यांची प्रेतयात्रा निघालेली आहे.यावर संत ज्ञानेश्वर माऊली प्रेताजवळ जाऊन म्हणाले ऊठ. सच्चिदानंद बाबा क्षणार्धात तिरडीवर ऊठुन बसले.थोर अशा संत ज्ञानेश्वर महाराजा सारख्या संत महापुरूषांनी परमार्थातील शक्ती समाजाला दाखवून दिली आहे.

खरा परमार्थाचा ध्वज संत महापुरूषांनी उभारला आहे.ऊभारीला ध्वज तीन्ही लोकावरी,पाहे पा ध्वजेचे चिरगुट राया जतन करीत... हे दोन वेगवेगळे प्रमाण देताना महाराज म्हणाले की राया म्हणजे राजा ,राष्ट्र यांना ध्वजाचे रक्षण करण्यासाठी कष्ट,काळजी घ्यावी लागते.आपल्या भारतीय तिरंगा ध्वजाचे रक्षण सिमेवर राहून सैनिक करतात.महाभारतातील युध्दात भगवान श्रीकृष्ण सारथी असलेल्या अर्जुनाच्या रथालाही ध्वज होता असे अर्जुनगिरी महाराज शेवटी म्हणाले.

> **आज महंत रामगिरी महाराज यांच्या काल्याचे किर्तनाने सांगता**
>
> पंचदिवशीय किर्तन महोत्सव सोहळ्याची आज मंगळवार दि.२१ रोजी सकाळी १० वाजता महंत रामगिरी महाराज श्रीक्षेत्र सराला बेट गोदाधाम यांच्या काल्याचे किर्तनाने सांगता होणार असून पंचक्रोशीतील गावोगावच्या भाविकांनी किर्तन व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन समस्त ग्रामस्थ व पंचदिवशीय किर्तन महोत्सव सप्ताह कमेटीने केले आहे.

## बेलापुरात भगवान परशुराम जन्मोत्सव उत्साहात साजरा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** तालुक्यातील बेलापूर येथे सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने अक्षय्य तृतीयेच्या शुभमुहूर्तावर भगवान परशुराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने आयोजित शोभायात्रा व महाआरतीला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

उत्सवाची सुरुवात विठ्ठल मंदिरात भजन, गायन व टाळ-मृदंगाच्या गजरात झाली. त्यानंतर भगवान परशुराम यांची प्रतिमा व पादुका सजविलेल्या रथातून शोभायात्रेला प्रारंभ झाला. केशव गोविंद गल्ली, जैन स्थानक मार्गे मुख्य रस्त्यांवरून शिस्तबद्ध मिरवणूक काढण्यात आली. मार्गातील विविध मंदिरांमध्ये महिलांनी ओटी भरून पूजन केले, तसेच सुबक रांगोळ्यांनी परिसर सजविला.

मुख्य चौकात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून जयघोष करण्यात आला. त्यानंतर मिरवणूक पुन्हा विठ्ठल मंदिरात परतली. येथे भगवान परशुरामांच्या प्रतिमेचे पूजन, महाआरती व भजनी मंडळाचा सत्कार करण्यात आला. महाप्रसाद वाटपाने कार्यक्रमाची सांगता झाली.

यावेळी भगवान परशुराम की जय व भारत माता की जयच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.



## राहुरीत रेस्ट्रोस्कॉपी सेंटरची अत्याधुनिक सेवा उपलब्ध

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** अक्षय तृतीयेच्या शुभमुहूर्तावर लिव्हर आणि पोटाच्या विकारांचे तज्ञ डॉ. इंद्रनील कुलकर्णी यांनी कुलकर्णी हॉस्पिटल, राहुरी येथे अत्याधुनिक गॅस्ट्रोस्कोपी सेंटरची अत्याधुनिक सेवा उपलब्ध झाली आहे. गेस्ट्रोस्कोपी म्हणजे अन्नपचन संस्थेच्या सुरुवातीच्या भागाची म्हणजे घसा, अन्ननलिका, जठर, लहान आतड्याचा पहिला भाग यांची दुर्बिणी द्वरे तपासणी करणे. ही अतिशय सोपी प्रक्रिया आहे. गॅस्ट्रोस्कोपी ही प्रक्रिया पाच ते दहा मिनिटात पूर्ण होते. दवाखान्यात ॲडमिट राहण्याची वेळही येत नाही. डॉ. इंद्रनील कुलकर्णी यांनी ऑलिम्पस या बहुराष्ट्रीय कंपनीची प्रणाली घेतली आहे.आज पर्यंत सर्वात प्रगत प्रणाली आहे. या सेंटरचा शुभारंभ डॉ. बाबुराव तनपुरे सहकारी कारखान्याचे अध्यक्ष अरुण तनपुरे, रावसाहेब तनपुरे, डॉ. शरद धावडे, राहुरी नगर परिषदेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे, राहुरी नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष गजानन सातभाई, डॉ. संजय म्हसे, डॉ.भरत पैठणे, डॉ. अभिजीत शिरसाट, डॉ. श्रीकांत कुलकर्णी, डॉ. तनया कुलकर्णी आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.



## संत-महंतांविषयी अपमानास्पद वक्तव्याचा वारकरी संप्रदायकडून निषेध




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** हिंदू धर्मीयांचे श्रद्धास्थान असलेल्या संत-महंतांविषयी अपमानास्पद शब्द वापरल्याच्या निषेधार्थ वारकरी क्रांती सेना, ज्ञानराज माऊली वारकरी गुरुकुल संस्था आश्वी, वैदिक हिंदू वारकरी बहुउद्देशीय सेवा संघाच्या वतीने संगमनेर येथे निषेध व्यक्त करण्यात आला आहे. तसेच संबंधित व्यक्तीवर कठोर कारवाई करण्याची मागणी प्रांत अधिकार्यांकडे निवेदना द्वरे केली आहे.

याबाबत संगमनेर उपविभागाचे प्रांताधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे प्रवक्ते विकास लवांडे यांनी हिंदू धर्मीयांच्या श्रद्धास्थान असलेल्या वारकरी संप्रदायातील संत-महंतां विषयी अपमानास्पद व आक्षेपार्ह वक्तव्य केले आहे त्यामुळे संपूर्ण राज्यात त्यांच्या वक्तव्याचा निषेध होत आहे . या वक्तव्यामुळे वारकरी समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या असून समाजामध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे., अशा प्रकारच्या वक्तव्यांमुळे राज्यात सामाजिक अस्थिरता निर्माण होण्याची शक्यता असून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्नही निर्माण होऊ शकतो. त्यामुळे लवांडे या व्यक्तीवर तातडीने कडक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी क्रांती सेना, वारकरी संस्थेच्या महिला प्रदेश अध्यक्षा रोहिणीताई राऊत सुनील महाराज पवार वेणूनाथ महाराज विखे लक्ष्मण महाराज पानसरे खेमनर महाराज नान्नर महाराज ज्ञानदेव महाराज पानसरे पोपट महाराज आगलावे वाघमोडे महाराज शेळके महाराज सातपुते महाराज ज्योतीताई पवार महाराज तसेच शिवसेना शहर प्रमुख विनोद सूर्यवंशी नगरसेविका साक्षी सूर्यवंशी शशांक नामन श्याम नाईकवाडी मुकेश मुर्तडक यांच्यासह वारकरी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे सविस्तर हेडिंग सह बातमी तयार करा

## आश्वी परिसरात चोऱ्यांचे सत्र सुरूच

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी :** संगमनेर तालुक्यातील आश्वी पोलीस स्टेशनच्या हद्दीत चोरट्यांनी अक्षरशः धुमाकूळ घातला असून, पोलिसांना आव्हान देत चोऱ्यांचे सत्र सुरूच ठेवले आहे. रविवारी मध्यरात्री कोंची शिवारात चोरट्यांनी एका घरावर डल्ला मारत ५० ते ५५ हजार रुपयांची रोकड लंपास केली. सतत होणाऱ्या या धाडसी चोऱ्यांमुळे संपूर्ण पंचक्रोशीत दहशतीचे सावट पसरले असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कोंची शिवारातील गिरी वस्ती (गोसावी वस्ती) येथे सोमवारी पहाटे सुमारास चोरट्यांनी अमोल मोहन गिरी हे घराबाहेर झोपेल असल्याचा फायदा घेऊन घरात प्रवेश केला. घरातील सामानाची उचकापाचक करून चोरट्यांनी ५० ते ५५ हजार रुपयांची रोकड आणि महत्त्वाचे कागदपत्रे चोरून नेली. केवळ याच क्षठिकाणी थांबून न राहता, चोरट्यांनी परिसरातील इतर एक-दोन ठिकाणीही हात मारण्याचा प्रयत्न केला. मात्र, नागरिकांना जाग आल्याचे लक्षात येताच चोरट्यांनी तिथून पळ काढला. याबाबत मात्र, अद्याप कोणतीही तक्रार दाखल करण्यात आलेली नाही. नुकतीच उंबरी बाळापूर आणि आश्वी येथे चोरट्यांनी दोन ते तीन ठिकाणी धुमाकूळ घातला होता. एका वृध्द महिलेला जखमी करून सोन्याचे दागिने आणि रोकड लंपास केली होती. त्यामुळे या चोरांच्या टोळीचा छडा लावण्याचे मोठे आव्हान पोलीसासमोर आहे. दरम्यान, यापुर्वी परिसरात झालेल्या चोऱ्यांचा तपास अद्याप लागलेला नसताना उंबरी बाळापूर, आश्वी येथील घटनेनंतर तरी पोलीस या चोरट्यांच्या मुसक्या आवळणार का? की सामान्य जनतेला अशाच दहशतीच्या सावटाखाली राहावे लागणार? असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

## पटारे वस्ती शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** तालुक्यातील निमगाव खैरी येथील पटारे वस्ती जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शनिवार दिनांक १८ एप्रिल रोजी वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले.

निमगाव खैरी गावचे सरपंच दत्तात्रेय झुराळे व सामाजिक कार्यकर्ते तथा ग्रामपंचायत सदस्य संतोषजी भागडे व सामाजिक कार्यकर्ते नितीनजी भागडे व केंद्रप्रमुख राजु इनामदार व केंद्रप्रमुख पिलगर यांच्या प्रमुख उपस्थितीत उपस्थित दीप प्रज्वलन, प्रतिमापूजन करून या स्नेहसंमेलनास सुरुवात करण्यात आली आले. प्रारंभी केंद्रप्रमुख राजू इनामदार यांनी शाळेची माहिती सांगत विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध उपक्रम सुरू केले असल्याचे सांगितले आहेत. त्यानंतर निमगाव खैरी येथील सामाजिक कार्यकर्ते संतोष भागडे यांनी प्रत्येक वर्गात पहिला येणाऱ्या विद्यार्थ्यास रोख स्वरूपात रु १५०० व सन्मानचिन्ह देऊन त्याचा गौरव करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

स्नेहसंमेलनास शोभा वाढवण्याचे काम निमगाव खैरीचे सरपंच दत्तात्रय झुराळे, सामाजिक कार्यकर्ते संतोष भागडे, सामाजिक कार्यकर्ते नितीन भागडे, केंद्रप्रमुख राजु इनामदार केंद्रप्रमुख पिलगर, शिक्षक बँकेचे माजी चेअरमन बाळासाहेब सरोदे, केंद्र समन्वयक वाघुजी पटारे, जब्बर सय्यद, अर्जुन बडोगे, एकनाथ रहाटे, राजू बनसोडे, बाळासाहेब पाटोळे, सुजित बनकर, आदमाने अमोल गट, तुकाराम डोके, गणेश पिंगळे, निमगावचे शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष महेंद्र साबळे, नाऊर शाळेचे मुख्याध्यापक गायकवाड,दिघीचे खरात गोंडेगाव शाळेचे गायकवाड रामपूर शाळेचे मुख्याध्यापक लोंढे यांसह मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते उपस्थित होते.



## भगवान परशुराम जयंती निमित्त टाळ मृदुंगाच्या गजरात शोभायात्रा



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** भगवान परशुराम यांच्या जन्मोत्सवा निमित्त निमित्त नेवासा तालुका ब्राह्मण समाजाच्या वतीने भगवान मोहिनीराज मंदिर प्रांगणात सजवलेल्या रथातील भगवान परशुराम यांच्या मुर्तीचे पुजन वेदशास्त्र संपन्न रामचंद्र काटकर गुरुजी व अशोकराव कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात येऊन टाळ मृदुंगाच्या निनादात शोभायात्रा काढण्यात आली. चौकाचौकात फटाक्यांच्या आतषबाजीत शोभायात्रेचे स्वागत करण्यात आले.

मिरवणुकीच्या अग्रभागी नेवासा बुद्रुक शिवारातील सुरेगाव रस्त्यावर असलेल्या सदगुरू नारायणगिरी महाराज आश्रमाचे विद्यार्थी, श्री हनुमान भजनी मंडळाचे सेवेकरी अशोकराव लोखंडे,भाऊसाहेब माळवे,ज्ञानेश्वर काळे,नवनाथ बर्डे,कांतीलाल वर्मा,आबा पडवळ, यशवंतराव शिर्के,मारुती खरात,सौ. कमलताई कराळे, सौ.अलकाताई खरात,श्रीमती आशाबाई गायकवाड यांनी अभंग भजने गाऊन शोभायात्रेची रंगत वाढवली.

पुष्पांनी सजवलेल्या रथामध्ये भगवान परशुरामांची मुर्ती रथाच्या मागे भजने गाणारे भजनी मंडळाचे पथक, महिला पुरुष भाविक असे या मिरवणुकीचे स्वरूप होते सदरची मिरवणूक औदुंबर चौक,श्री विश्वेश्वर नाथबाबा चौक, श्री खोलेश्वर गणपती मंदिर ,नगर पंचायत चौक मार्गे श्री हनुमान मंदिर येथुन श्री मोहिनीराज मंदिर प्रांगणात आल्यावर भगवान श्री परशुराम यांची आरती करण्यात आली. त्यानंतर उपस्थित भाविकांना महाप्रसाद देण्यात आला. या मिरवणुकीत नेवासा तालुक्यातील ब्राह्मण समाज बांधवांसह सकल हिंदू समाज मोठ्या संख्येने सहभागी झाला होता

## संजीवनी इंजिनीअरींगच्या सात विद्यार्थ्यांची नोकरीसाठी निवड

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजच्या ट्रेनिंग अँड (टी अँड पी) प्लेसमेंट विभागाच्या पुढाकारातून सात विद्यार्थ्यांना नामांकीत कंपन्यात आकर्षक पगाराची नोकरी मिळाली. संजीवनीत प्रवेश म्हणजे नामांकीत कंपनीत नोकरीची किंवा यशस्वी उद्योजक घडवीण्याची संधी हे समिकरण दरवर्षाप्रमाणे यंदाही कायम आहे. विद्यार्थांना एकापाठोपाठ एक नोकरींच्या संधी मिळत आहेत. एका अर्थाने संजीवनीच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या टिमने पालक आणि विद्यार्थ्यांचा संजीवनी वरील विश्वास सार्थ ठरवीला आहे.

निवड झालेले हे विद्यार्थी अंतिम सत्रातील आहेत. त्यांच्या परिक्षेच्या निकाला अगोदर नोकराची आर्डर हाती पडली आहे. कॉनकास्ट (इंडिया) प्रा. लिमिटेड कंपनीने सिव्हिल इंजिनिअरींगच्या प्रतिक्षा रामदास पुरी व स्ट्रक्चरल इंजिनिअरींगच्या प्रशांत रमेश व्यापारे यांची निवड केली आहे. मॅक्स सरफेस ट्रिटमेंट प्रा. लिमिटेड कंपनीने मेकॅनिकल इंजिनिमअरींगच्या निलेश दिपक रासकर, दीप बाबासाहेब सोनवणे व सुयश प्रदिप थोरात यांची निवड केली आहे. आर्मस्ट्रॉन्ग डिमॅटीक लिमिटेड या कंपनीने मेकॅट्रॉनिक्स इंजिनिअरींगच्या सक्षम महेंद्र कुलकर्णी व आदित्य बाळासाहेब वारूळे यांची निवड केली आहे.

ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाकडून विद्यार्थ्यांची मुलाखती पासून व्यक्तीमत्व विकासा पर्यतची सर्व तयारी करून घेतली जाते. त्याचवेळी उद्योग जगतातील नामांकित कंपन्यांच्या व्यवस्थापनासोबत संपर्क ठेऊन त्यांना कशाप्रकारचे कुशल अभियंते हवे आहेत याचा मागोवा घेतला जातो. त्यानुसार विद्यार्थी घडवीले जातात. त्यामुळे नामांकित कंपन्या संजीवनीच्या विद्यार्थ्यांना प्राधान्याने संधी देतात.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# भानसहीवरा येथील कवीजंग बाबांच्या

## यात्रा उत्सवाची बैलगाडा शर्यतीने सांगता

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा फाटा :** तालुयातील भानसहीवरा येथील कवीजंग बाबांच्या यात्रा उत्सवाची तालुयातील सर्वात मोठ्या बैलगाडा शर्यतीने उत्साहात सांगता करण्यात आली. शेवटच्या बैलगाडा विजेत्यास यात्रा कमिटीच्या वतीने २१ हजार रुपये बक्षीस देण्यात आले. भानसहिवरा येथील सर्व धर्मीयांच्या ऐयाचं प्रतीक समजल्या जाणाऱ्या ग्रामदैवत कवीजंग बाबा व तयासाहब यांचा यात्रा उत्सव म्हणजे परिसरातील गावांसह लगत असलेल्या गावातील भाविकांची पर्वणी असते या यात्रा उत्सवामध्ये परिसरातून मोठ्या प्रमाणात भाविक बाबाच्या समाधीच्या दर्शनासाठी येत असतात हा यात्रा उत्सव पंचायत समितीचे माजी सभापती किशोर जोजार व गावचे लोकनियुक्त सरपंच मीनाक्षी जोजार उपसरपंच दत्तात्रय काळे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामस्थ व यात्रा कमिटीच्या सहकार्याने विविध धार्मिक तसेच मनोरंजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यात कावड मिरवणूक संदल, छबीना, आर्केस्ट्रा, लोकनाट्य तमाशा आणि बैलगाडा शर्यत आदी प्रकारच्या कार्यक्रमाला गावातील बहुसंख्या भाविक व ग्रामस्थांनी गर्दी केली होती. त्याच बरोबर येथील शोभेच्या दारूचा अतिशबाजीचा सामना या यात्रेच मुख्य आकर्षण असतं हा सामना बघण्यासाठी पुरुषांसह महिलांची गर्दी लक्षणीय होती येथील बैलगाडा शर्यतीसाठी तालुयासह जिल्हाभरातून जवळपास दोनशेहून अधिक बैलगाडा धारक शर्यतीसाठी भानसहिवरा येथे दाखल झाले होते.



नेवासा तालुक्यातील भानसहिवरा येथे सर्वात मोठ्या बैलगाडा शर्यतीतील एक क्षण **(छाया - सोपान भगत)**

तर बैलगाडा शर्यत बघण्यासाठी चार ते पाच हजार बैलगाडा शौकीनांची उपस्थिती होती. हा यात्रा उत्सव यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी यात्रा कमिटीचे अध्यक्ष अध्यक्ष ज्ञानेश्वर पवार, उपाध्यक्ष पवन जाधव, खजिनदार संदीप तळपे, बाबासाहेब ढवाण, नंदू जाधव, पोपट शेकडे, राजेंद्र नळकांडे, गणेश मुनोत, समाधान गुजर, वाहिद देशमुख, गणेश भुजबळ, नीलेश मकासरे, संजय गोरे यांचेसह ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

---

द • ख • ल

### आक्षेपार्ह विधानप्रकरणी विकास लवांडेंवर कारवाईची मागणी

**नेवासा :** तीर्थक्षेत्र देवगड देवस्थानचे प्रमुख महंत शांतिब्रम्ह श्री भास्करगिरीजी महाराज तसेच इतर संत-महात्म्यांविषयी आक्षेपार्ह विधान केल्याप्रकरणी विकास लवांडे यांच्यावर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी भाजप नेते अनिल ताके पाटील यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी अप्पर जिल्हा पोलीस अधीक्षक यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. निवेदनात ताके पाटील यांनी नमूद केले की, देवगड संस्थानची परंपरा समर्थ सद्गुरू किसनगिरी बाबा यांच्या त्याग, तपस्या व भक्तीवर आधारलेली असून, भास्करगिरीजी महाराजांनी सामाजिक व धार्मिक क्षेत्रात मोठे कार्य केले आहे. त्यांनी नेहमीच जात, पंथ किंवा पक्षभेद न करता सर्व समाजघटकांना समान वागणूक दिली आहे. असे असताना विकास लवांडे यांनी संत-महात्म्यांबाबत 'वारकरी संप्रदायातील घुसखोर' असा अवमानकारक उल्लेख करून धार्मिक भावना दुखावल्या असल्याचा आरोप ताके पाटील यांनी केला. या वक्तव्याचा त्यांनी तीव्र निषेध व्यक्त केला असून संबंधितांनी तातडीने माफी मागावी, अन्यथा त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. या प्रकरणामुळे वारकरी संप्रदायात नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून, कायदेशीर कारवाईची मागणी जोर धरत आहे.



### श्रीरामपूर मतदारसंघासाठी इडअ-१ पदावर बाबासाहेब चिडे यांची नियुक्ती

**माळवाडगांव :** भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेशाच्या वतीने मतदार यादी पुनर्निरीक्षण (डखठ) अभियानाला गती देण्यासाठी महत्त्वपूर्ण संघटनात्मक नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे. या अंतर्गत श्रीरामपूर (अ.जा.) विधानसभा मतदारसंघासाठी इडअ-१ (विधानसभा प्रमुख) पदावर तालुकाध्यक्ष बाबासाहेब चिडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या स्वाक्षरीने २६ मार्च २०२६ रोजी ही नियुक्ती जाहीर करण्यात आली. या नियुक्तीबद्दल चिडे यांचे अभिनंदन करताना पक्षाने त्यांच्याकडून मतदार यादी पुनर्निरीक्षणाच्या कामात सक्रिय सहभागाची अपेक्षा व्यक्त केली आहे. या अभियानाच्या माध्यमातून मतदार नोंदणी, दुरुस्ती आणि अद्ययावत प्रक्रिया अधिक प्रभावीपणे राबवण्यावर भर दिला जाणार आहे. तसेच, स्थानिक पदाधिकारी आणि जनप्रतिनिधींसोबत समन्वय साधून इडअ-२ पदांची नियुक्ती करून त्याची माहिती प्रदेश कार्यालयाला पाठविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ही नियुक्ती आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाची मानली जात असून, संघटनात्मक बळकटीसाठी हा निर्णय निर्णायक ठरणार आहे. त्यांच्या या निवडीबद्दल विविध स्तरातून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

### प्रवरेच्या दोन माजी विद्यार्थ्यांची बँक ऑफ बडोदामध्ये निवड





**लोणी :** लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील कृषी महाविद्यालयातील माजी विद्यार्थी किशोर कुंभार आणि बाजीराव वराट यांनी आय.बी. पी.एस. मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेत यश संपादन करत बँक ऑफ बडोदा मध्ये सहाय्यक व्यवस्थापक या पदासाठी निवड झाली आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य अमोल खडके यांनी दिली. किशोर कुंभार आणि बाजीराव वराट यांनी प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कृषी महाविद्यालय, लोणी येथून बी.एस्सी. (कृषी) पदवी शिक्षण घेत असताना बँक निगडीत स्पर्धा परीक्षेची तयारी करून हे यश संपादन केले आहे.

### यंदा गंगागिरी महाराजांचा सप्ताह धनगरवाडीत

**वाकडी :** राहता तालुयातील धनगरवाडी येथे होणाऱ्या योगीराज सद्गुरू गंगागिरीजी महाराजांच्या १७९ व्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर सप्ताह स्थळाची पाहणी करण्यात येणार आहे. सरला बेटाचे मठाधिपती रामगिरी महाराज बुधवार, दि. २२ एप्रिल रोजी सायंकाळी ४ वाजता धनगरवाडी येथे येणार असल्याची माहिती सप्ताह कमिटी व ग्रामस्थांनी दिली. आशिया खंडातील सर्वात मोठा आणि गिनीज बुकमध्ये नोंद असलेला हा सप्ताह यंदा धनगरवाडी व सप्तक्रोशी परिसरात आयोजित करण्यात येत आहे. भाविकांची मोठ्या प्रमाणावर होणारी गर्दी लक्षात घेता पार्किंग, भोजन प्रसाद, मंडप, कीर्तन तसेच सुरक्षा व्यवस्थेचे नियोजन करण्यासाठी ही पाहणी महत्त्वाची ठरणार आहे. रामगिरीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली सप्ताहाचे नियोजन करण्यात येणार असून, या पाहणीवेळी परिसरातील भाविकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन धनगरवाडी ग्रामस्थ, भजनी मंडळ व सप्तक्रोशीतील नागरिकांनी केले आहे.

### खुल्या बुद्धिबळ स्पर्धेत आयुष धनेधर तालुयात द्वितीय

**शिरसगाव :** आमदार चषक अंडर ९ खुल्या बुद्धिबळ स्पर्धा मध्ये आयुष सुहास धनेधर हरेगाव याने श्रीरामपूर तालुयात द्वितीय क्रमांक पटकवल्या बद्दल व त्याला ट्रेनींग देणारे तन्मय किशोर निळे यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. हरेगाव जनहित विकास समिती अध्यक्ष सुनील शिनगारे सूर्या प्रतिष्ठानचे अध्यक्ष आकाश सूर्यवंशी, राजेश चव्हाण, अतुल भालेराव, संदिप धनेधर, संघर्ष प्रतिष्ठान उंदीरगाव, मॉर्निंग क्रिकेट लब हरेगाव विश्वरत्न मित्र मंडळ दोनवाडी यांनी आयुषचे विशेष कौतुक केले.

---

## बोरावके महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शन उत्साहात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** येथील रा.ब.नारायणराव बोरावके कॉलेजमध्ये ग्रंथालय विभागाच्यावतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर : जीवन व कार्य या विषयावर विशेष ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन रयत शिक्षण संस्था मॅनेजिंग कौन्सिल सदस्या मीनाताई जगधने यांचे अध्यक्षतेखाली करण्यात आले.या प्रदर्शनामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनप्रवास, शैक्षणिक कार्य, सामाजिक परिवर्तनातील योगदान, भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीतील भूमिका तसेच त्यांच्या विचारसरणीवर आधारित विविध ग्रंथ, संदर्भ पुस्तके, चरित्रे, दुर्मिळ साहित्य, छायाचित्रे आणि नियतकालिकांचा समावेश करण्यात आला. या प्रदर्शनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना त्यांच्या कार्याचा सखोल अभ्यास व संशोधन करण्याची मौल्यवान संधी उपलब्ध झाली. ग्रंथालय विभागाच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड वाढीस लागून त्यांच्यामध्ये सामाजिक जाणीवा अधिक बळकट होण्यास मदत होईल. याप्रसंगी मीनाताई जगधने यांनी सदर उपक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य, प्रो. डॉ. प्रवीण बडधे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य, प्रो. डॉ. अनुप दळवी व प्रो. डॉ. शरद शेळके यांची विशेष उपस्थिती लाभली.

त्याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून महाविद्यालयात प्रश्नमंजुषा स्पर्धा, प्रा.डॉ. बाबासाहेब शेंडगे यांचे व्याख्यान, सलग अभ्यास अभियान, ग्रंथ प्रदर्शन व निबंध स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला, डॉ. अशोक माहुरे, डॉ. योगिता रांधवणे, डॉ. योगिता बागुल, डॉ. अर्जुन आनंदकर, प्रा. शंकर मुंडे, राजेंद्र शिंदे, संतोष वडणे, बाळू जाधव, मदन शिंदे तसेच विभागप्रमुख, प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## अहमदनगर मर्चंटस बँकेच्या दाळमंडई येथील विस्तारीत 'हेड ऑफिस अनेक्स'चा शुभारंभ





**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नगर :** बँकिंग क्षेत्रातील वाढत्या स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर ग्राहकांना अत्याधुनिक व दर्जेदार सेवा देणे आवश्यक बनले असून, अहमदनगर मर्चंटस को-ऑप बँकेने या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. बँकेच्या दाळमंडई येथील विस्तारीत 'हेड ऑफिस अनेक्स'चा शुभारंभ अक्षय्य तृतीयेच्या शुभमुहूर्तावर उत्साहात संपन्न झाला.

या अनेक्सचे उद्घाटन संचालक किशोर गांधी व संजय बोरा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्हाईस चेअरमन अमित मुथा, संचालक सीए आयपी अजय मुथा, किशोर मुनोत, विजय कोथिंबीरे, सुभाष बायड, बोर्ड ऑफ मॅनेजमेंट सदस्य राजेश झंवर, सीईओ सुनील पुराणिक, जॉइंट सीईओ नितीन भंडारी, कर्मचारी प्रतिनिधी प्रसाद गांधी, जितेंद्र बोरा तसेच अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना संचालक किशोर गांधी यांनी सांगितले की, बँकेचे संस्थापक व विद्यमान चेअरमन हस्तीमलजी मुनोत यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली बँकेने सातत्याने प्रगती केली असून, अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित सेवा देण्यावर नेहमीच भर दिला आहे. डिजिटल बँकिंगच्या युगात ग्राहकांना अधिक सुलभ व जलद सेवा देण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा सक्षम करण्याच्या उद्देशाने हेड ऑफिसचा विस्तार करण्यात आला आहे. या नवीन अनेक्समुळे विविध विभागांचे कामकाज प्रशस्त व सुसज्ज जागेत होणार असून, सभासद, खातेदार, कर्जदार व ठेवीदारांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

संजय बोरा यांनी आपल्या मनोगतात मर्चंटस बँकेच्या ५५ वर्षांच्या यशस्वी वाटचालीचा उल्लेख करत बँकेने विश्वासार्हता व उत्कृष्ट आर्थिक कारभारामुळे महाराष्ट्रात वेगळी ओळख निर्माण केल्याचे सांगितले. संस्थापक हस्तीमलजी मुनोत यांच्या मार्गदर्शनाखाली बँकेने उल्लेखनीय कामगिरी करत ग्राहककेंद्री सेवा दिल्या असल्याचे त्यांनी नमूद केले. नवीन विस्तारीत हेड ऑफिसमुळे सेवा अधिक गतिमान व परिणामकारक होण्यास मदत होईल, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी व्हाईस चेअरमन अमित मुथा यांनी उपस्थितांचे आभार मानले.

---

## शिर्डीचा अंतिम विकास आराखडा तातडीने मंजूर करा :

### गोंदकर कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शहर विकासाला गती देण्याची मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** जागतिक कीर्तीचे देवस्थान असलेल्या शिर्डी शहराचा अंतिम विकास आराखडा तातडीने मंजूर करावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते रमेश गोंदकर यांनी केली आहे. आगामी वर्षी नाशिक येथे होणाऱ्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर साईभक्तांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता असल्याने शहरातील मूलभूत सुविधांचा विकास तातडीने होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. शिर्डी शहराचा विकास आराखडा १९९२ मध्ये पुढील २५ ते ३० वर्षांचे उद्दिष्ट ठेवून मंजूर करण्यात आला होता. त्यामध्ये रस्ते, उद्याने, पार्किंग, डम्पिंग ग्राउंड, शाळा, क्रीडांगणे तसेच रिंगरोडसह विविध सुविधा उभारण्यासाठी ५३ ठिकाणी आरक्षण करण्यात आले होते.



मात्र गेल्या ३३ वर्षांत निधीअभावी या आरक्षणांचा विकास होऊ शकलेला नाही. परिणामी, आरक्षित जमिनींचा उपयोग होत नसल्याने जमीनधारकांना मोठ्या आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. नगररचना विभागाने वेळोवेळी आराखड्याचा आढावा घेतला असला तरी अनेक ठिकाणी आरक्षण जैसे थे ठेवण्यात आले, तर काही ठिकाणी बदल करून नव्याने आरक्षण टाकण्यात आले. त्यामुळे जमीनमालकांना ना जमीन विकसित करता येते, ना योग्य मोबदला मिळतो, अशी स्थिती निर्माण झाली आहे. यावर उपाय म्हणून नगरपरिषदेनं भूसंपादन करून बाजारभावाने मोबदला द्यावा किंवा दीर्घकाळ प्रलंबित असलेली आरक्षणे रद्द करावीत, अशी मागणी होत आहे. दरम्यान, श्री साईबाबा संस्थानाने रिंगरोडसाठी निधी मंजूर केला असला तरी तो न्यायालयीन प्रक्रियेत अडकला आहे.

## भास्करराव गलांडे विद्यालयात एआय लॅब व व्यवसाय मार्गदर्शन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव :** श्रीरामपूर तालुक्यातील उंदीरगाव येथील रयत शिक्षण संस्थेच्या भास्करराव गलांडे पाटील विद्यालयात लवकरच एआय लॅब उभारण्यात येणार असून इयत्ता सहावीपासून विद्यार्थ्यांसाठी व्यवसाय मार्गदर्शन सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा मॅनेजिंग कौन्सिल सदस्या मीनाताई जगधने यांनी केली. विद्यालयात सायकल वितरण, शालेय साहित्य वाटप तसेच एनएमएमएस परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता.



या कार्यक्रमात जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग, महिला व बालकल्याण विभाग आणि पंचायत समितीच्या सेस फंडातून ५१ विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप करण्यात आले. तसेच नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांना वह्यांचे वितरण करण्यात आले. यावेळी बोलताना जगधने यांनी विद्यार्थ्यांनी अधिकाधिक यश मिळवावे, असे आवाहन करत शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी शिक्षकांची जबाबदारी महत्त्वाची असल्याचे सांगितले. विद्यालयात इंटरॅक्टिव्ह बोर्ड उपलब्ध असून एआय लॅबमुळे विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाची संधी मिळणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मीनाताई जगधने होत्या. मुख्याध्यापक राजेंद्र कदम यांनी प्रास्ताविक करून विद्यालयाचा प्रगती आढावा मांडला. शिक्षणाधिकारी संजीवन दिवे यांनी गुणवत्ता वाढविण्यावर भर दिला. कार्यक्रमास विविध मान्यवर, शिक्षक, ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन सौ. टेकाळे यांनी केले तर आभार प्रदर्शन राजेंद्र कदम यांनी मानले.

## देवळाली प्रवरा येथे 'विराट हिंदू संमेलन'चे आयोजन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** देवळाली प्रवरा येथे सकल हिंदू समाजाच्या वतीने 'विराट हिंदू संमेलन'चे आयोजन करण्यात आले असून हा कार्यक्रम उद्या बुधवारी, दि. २२ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता बाजारतळ येथे होणार आहे. हिंदू समाजात एकता, बंधुता व समरसता निर्माण व्हावी, तसेच हिंदू संस्कृतीला नवी ऊर्जा व दिशा मिळावी या उद्देशाने या संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. हिंदू सारे एकदिलाने, बिंदू बिंदू जोडूया, बंधुत्वाचा समरसतेचा रामसेतू हा बांधूया हा संदेश यावेळी देण्यात येणार आहे. या संमेलनात प्रमुख उपस्थिती म्हणून महंत ह.भ.प. रामगिरी महाराज, महंत ह.भ.प. अर्जुन महाराज तनपुरे उपस्थित राहणार आहेत. तसेच धर्मजागरण क्षेत्रातील प्रमुख वक्ते मिलिंद वायकर मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाअंतर्गत भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले असून सायंकाळी ५ वाजता आण्णासाहेब कदम पुतळा (डेपो) येथून शोभायात्रा निघून बाजारतळ येथे समारोप होणार आहे. त्यानंतर मार्गदर्शन कार्यक्रम व महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले आहे. देवळाली, गुहा, राहुरी फॅटरी, चिंचविहिरे, गणेगाव, आंबीअमळनेर, जाताप आदी परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयाची राष्ट्रीय पातळीवर छाप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयाने राष्ट्रीय स्तरावर पुन्हा एकदा आपली छाप उमटवत डअए खपवळर आयोजित ढखऋअछ २०२६ आणि ठएएत २०२६ या प्रतिष्ठित स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक पटकावत दुहेरी यश संपादन केले आहे. या उल्लेखनीय कामगिरीमुळे महाविद्यालयाचे तांत्रिक शिक्षण, संशोधन आणि नावीन्यपूर्ण प्रकल्प विकासातील स्थान अधिक भक्कम झाले आहे. बंगळुरू येथे २३ ते २४ जानेवारी २०२६ दरम्यान पार पडलेल्या ठएएत (ठपसश ऐंशपवशव एश्रशलीीळल तशहळलश्रश) स्पर्धेत देशभरातील आठ संघांनी सहभाग घेतला होता. मेकॅनिकल विभागाच्या ढशरा ढीलेढळींरपी या संघाने उत्कृष्ट तांत्रिक कौशल्य, नावीन्यपूर्ण डिझाइन आणि प्रभावी सादरीकरणाच्या जोरावर प्रथम क्रमांक पटकावला. संघाने विकसित केलेल्या वाहनात कार्यक्षम ऊर्जा व्यवस्थापन आणि आधुनिक अभियांत्रिकी तत्त्वांचा उत्कृष्ट वापर दिसून आला. या यशासाठी संघाला ११ लाख रुपयांचे पारितोषिक प्रदान करण्यात आले. त्यानंतर महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे २ ते ३ एप्रिल २०२६ रोजी झालेल्या ढखऋ-छ २०२६ स्पर्धेत चरींशीळलज्ञी ८.० संघाने मल्टी ट्रान्सप्लांटर यंत्राच्या संकल्पनेवर आधारित उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक मिळवला. देशभरातील ३८ संघांमध्ये स्पर्धा रंगली होती. या संघाने सर्वाधिक रोपे लावण्याचा विक्रम करत परीक्षकांची दाद मिळवली. तसेच 'ठेर्लीीं ठशश्रळरलश्रश झ्रीींूशि' व 'चळश्रशींीपश अलहळशींशाशपीं -रीव' मिळवत, 'इशीीं उीं एषषशलींळींश झ्रीींूशि'मध्ये उपविजेतेपद पटकावले. या यशामागे विद्यार्थ्यांची सातत्यपूर्ण मेहनत, अचूक नियोजन आणि प्राध्यापकांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरल्याचे प्राचार्य डॉ. एम. ए. वेंकटेश यांनी सांगितले. संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब थोरात, विश्वस्त व पदाधिकाऱ्यांनी विजेत्या संघांचे अभिनंदन करून उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## मालुंजे-माहेगाव बंधारा बनला धोकादायक; तात्काळ दुरुस्तीची मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** मौजे मालुंजे बु. (ता. श्रीरामपूर) येथील प्रवरा नदीवरील मालुंजे-माहेगाव बंधारा (केटी वेअर) सध्या अत्यंत धोकादायक स्थितीत असून त्याची तात्काळ दुरुस्ती करावी, अशी मागणी वडाळा पाटबंधारे विभागामार्फत कार्यकारी अभियंता, अहिल्यानगर पाटबंधारे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, बंधाऱ्याचे अस्तित्वच धोक्यात आले असून विविध तांत्रिक समस्या गंभीर बनल्या आहेत. पुराच्या पाण्यामुळे बंधाऱ्याच्या उत्तर व पूर्व बाजूचा भराव वाहून गेला आहे. त्यामुळे कडेला मोठे खड्डे पडून बांधकाम उघडे पडले आहे. तसेच बंधाऱ्याच्या मध्यभागी असलेले संरक्षक लोखंडी पाईप (ग्रील) पूर्णपणे गायब झाले असून प्रवाशांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

दक्षिण व पश्चिम बाजूसही परिस्थिती चिंताजनक आहे. पुराच्या पाण्यामुळे बंधारा आणि नदीकाठ यांच्यामध्ये 'व्ही' आकाराची खोल दरी निर्माण झाली असून मोठ्या प्रमाणात भराव खचून वाहून गेला आहे. परिणामी, या भागात लांब-रुंदीचे खोल खड्डे पडले आहेत.

यामुळे महिला, विद्यार्थी व नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला आहे. दरम्यान, अनेक वर्षांपासून दुरुस्तीची मागणी होत असतानाही संबंधित विभागाकडून दुर्लक्ष होत असल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. येत्या जून २०२६ च्या पावसाळ्यापूर्वी दुरुस्ती न केल्यास परिस्थिती आणखी गंभीर होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

मागणीची दखल न घेतल्यास बाळासाहेब बडाख, श्रीकृष्ण बडाख, किशोर बडाख, अरुण बर्डे, बाळासाहेब बोरुडे व संदीप बडाख यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.



## श्रीराम तरुण मंडळाच्यावतीने भगवान परशुराम मिरवणूक रथाचे स्वागत



**श्रीरामपूर :** भगवान विष्णूचे सहावे अवतार मानले जाणारे श्री भगवान परशुराम जयंती निमित्त निघालेल्या मिरवणुकीचे श्रीराम मंदिर चौकात श्रीराम तरुण मंडळाच्यावतीने याहीवर्षी भव्य स्वागत करण्यात आले.भगवान परशुराम हे महान योद्धा होते. त्यांनी अन्याय आणि अधर्माविरुद्ध उभे राहून समाजात न्याय प्रस्थापित केला होता. २१ वेळा अन्यायी क्षत्रिय विरुद्ध युद्ध करून त्यांनी हिंदू धर्माचे रक्षण केले असून कितीही अन्याय मोठा असला तरी त्याचा सामना करण्याचे धैर्य आपल्यात असले पाहिजे. महाभारत काळात त्यांनी भीष्म, कर्ण यासारख्या महान योद्धांना शिक्षण दिले. आजच्या काळात भगवान परशुराम यांचे विचार अत्यंत महत्त्वाचे आहेत. जीवनात सत्य प्रामाणिकपणा आणि न्याय यांचे पालन करणे असे प्रतिपादन श्रीराम तरुण मंडळाचे संस्थापक अध्यक्ष व हिंद सेवा मंडळाचे सह सचिव अशोक उपाध्ये यांनी केले.भव्यआतिषबाजीनी परशुराम मिरवणुकीचे स्वागत व आलेले सर्व भक्तांना आईस्क्रीम व पिण्याचे पाण्याची व्यवस्था श्रीराम तरुण मंडळाच्यावतीने व उपाध्ये परिवाराकडून करण्यात आली होती. भगवान परशुराम यांचे प्रतिमेला मंडळाचे प्रमुख अशोक उपाध्ये, गौतम उपाध्ये, प्रकाश व दिपाली चित्ते, राजेंद्र सोनवणे, सचिन गुजर, राजेंद्र उंडे, सतीश शहाणे ,यांनी पुष्पहार अर्पण करून स्वागत केले.याप्रसंगी मंडळाचे जयराम उपाध्ये, संदीप शेडगे ध चापानेरकर, राजेंद्र पाटणी, दिनेश आंभोरे, रमाकांत पाथरकर, सोमनाथ कदम, सिद्धार्थ साळवे, राजेंद्र भावसार, भैय्या अत्तार, नवल मलजी शर्मा, सुमित उपाध्ये, बाळासाहेब उपाध्ये उपस्थित होते.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मढेवडगाव येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मढेवडगाव येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात आणि जल्लोषात पार पडले. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून विठ्ठल आप्पा नागवडे, सरपंच प्रमोदजी शिंदे आणि स्मितल भैया वाबळे उपस्थित होते. तसेच निळकंठ बोरुडे, भुकन साहेब, मार्गदर्शक आबासाहेब जगताप, संतोष गायकवाड, अविनाश निंभोरे, उपसरपंच सौ. उंडेताई यांच्यासह ग्रामपंचायत व सोसायटीचे आजी-माजी सदस्य, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सोमनाथ फरकांडे, उपाध्यक्ष, पालक, ज्येष्ठ नागरिक, तरुण वर्ग व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांच्या 'गणेश वंदना'ने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. गाणी, पोवाडे, भीमगीते, देशभक्तीपर गीते व लोकगीतांवर आकर्षक सादरीकरण करण्यात आले. 'शिवकन्या', 'छत्रपती शिवरायांचा पोवाडा' आणि 'अंबाबाईचा गोंधळ' या सादरीकरणातून पारंपरिक संस्कृतीचा ठसा उमटला. 'पाणी हरवलं' या नाटकाद्वारे सामाजिक प्रबोधन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट सादरीकरणाला प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट करत दाद दिली. मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत शिक्षणासोबत सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रातही प्रगती करण्याचे मार्गदर्शन केले. यावेळी युवा उद्योजक संतोषजी गायकवाड यांनी शाळा सुशोभीकरणासाठी दोन लाख रुपयांची मदत जाहीर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय नलगे व संतोष खोमणे यांनी केले, तर भाऊसाहेब जगताप यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मुख्याध्यापिका वनिता नलगे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक राजू शिर्के, मीना चाकणे, मंगल पानसरे व सुवर्णा बारस्कर यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी मुख्याध्यापिका वनिता नलगे यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार मानले.



# ऊस उत्पादक व तोडणी कामगारांची थकीत रक्कम द्या; अन्यथा बोंबाबोंबचा इशारा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** तालुक्यातील संजीवनी ठरलेल्या गंगापूर सहकारी साखर कारखाना गेल्या अनेक वर्षांपासून बंद असताना,संभाजी ब्रिगेडच्या माध्यमातून शेतकरी कृती समिति हे शेतकरांच्या समन्वयाचं मंच तयार करुन, कारखाना शेतकरी हितासाठी चालु व्हावा, यासाठी सातत्याने पाठपुरावा केल्याने जय हिंद शुगर मिल्स तर्फे गेल्या तीन वर्षांपासून सदरील कारखाना सुरू झाला आहे.

हा कारखाना सुरळीतपणे चालावा या दृष्टिकोनातुन मुक्तेश्वर शुगर मिल्स धामोरी आणि पैठण परिसरातील अनेक शेतकऱ्यांना ऊस देण्यासाठी, आम्ही शेतकऱ्यांमध्ये विश्वासाहर्ता निर्माण करत जागृती केली होती की, आपल्या तालुक्याचा कारखाना कायम चालु राहण्यासाठी ऊस देऊन सहकार्य करा, आपणांस इतर कारखान्याचां तुलनेत भाव देऊ,तरी आपल्या कारखानाचा भाव कमी असतानाही सकारात्मक दृष्टिने




शेतकरांनी ऊस दिला आहे. मात्र कारखाना २० फेब्रुवारी रोजी बंद होऊनही, आज २०एप्रिल पर्यंत मात्र १६ जानेवरी-पर्यंतच्या शेतकरांचे पैसे दिले, असल्याचे कळते आहे.आपण तात्काळ उर्वरीत सर्व राहिलीले २० फेब्रुवारी पर्यंतचे सर्व थकित बिले, एक रक्कमी अदा करण्याच्या अनुषंगाने तात्काळ निर्णय घेऊन येत्या ३० एप्रिल सर्व शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम अदा करावी.

तसेच ऊस तोडणी कामगारांचे सुद्धा आपण तात्काळ पैसे अदा करून, पुढील हंगामाच्या अनुषंगाने सकारात्मक दृष्टिकोनातुन शेतकरी व कारखाना यांच्यात सुसंवाद ठेवावा ह्या माघणीचे निवेदन संभाजी ब्रिगेड च्या वतीने देण्यात आले आहे.

सदरील माघणीच्या अनुषंगाने ३०एप्रिल रोजी पर्यंत रक्कम अदा न झाल्यास १ मे रोजी आपल्या कार्यालयासमोर संभाजी ब्रिगेड, शेतकरी व कामगारांच्या भावना लक्षात घेता बोंबाबोंब आंदोलन करेल.असा इशारा देण्यात आला आहे.

या निवेदनावर संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष योगेश शेळके धामोरीकर, तालुका संपर्क प्रमुख संकेत मैराळ,संघटक अजय देवकर, सोमनाथ मनाळ, महेश खेडकर, गणेश सोनवणे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरणास तातडीने स्थगिती द्या, मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** महाराष्ट्र शासनाने दहा एप्रिल रोजी अनुसूचित जातीच्या आरक्षणामध्ये उपवर्गीकरन करण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. ही प्रक्रिया तातडीने बंद करण्याचे निवेदन नेवासा काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीने तहसीलदार यांना दिले.

राज्य सरकारने सुरु केलेल्या उपवर्गीकरण प्रक्रियेमुळे अनुसूचित जातीमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. आरक्षणाच्या प्रक्रियेत बदल करताना पारदर्शकता,न्याय, आणि सर्वसमावेशक प्रक्रिया अपेक्षित असते, दुर्दैवाने सध्या सुरु असलेल्या उपवर्गीकरन प्रक्रियामध्ये पारदर्शकता दिसून येत नाही.उपवर्गीकरणासाठी केवळ प्रशासकीय अधिकाऱ्यांची समिती स्थापन केलेली असून यात समाजाचा एकही प्रतिनिधी यात




समावेश नाही.तसेच समितीचा अहवाल जनतेसमोर सादर न करता केवळ आक्षेप मागितले जात आहे.याशिवाय अंत्यन्त घाई घाईत प्रक्रिया पूर्ण करण्याचा सपाटा लावला जात आहे.या सर्व गोष्टी संशयस्पद असल्यामुळे ही उपवर्गीकरण प्रक्रिया तात्काळ स्थगित करण्यात यावी.अशी मागणी करण्यात आली.यावेळी दिलेल्या निवेदनात

उपवर्गीकरण समितीचा अहवाल सार्वजनिक करण्यात यावा,राज्यभरात जणसूनावण्या घेण्यात याव्या.व जनतेची मते विचारात घेण्यात यावी,सर्व आक्षेप, सूचना विचारात घ्याव्यात व नंतरच अंतिम निर्णय घ्यावा.या मागण्या करण्यात आल्या.यावेळी काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी उपवर्गीकरण प्रक्रिया ही अंत्यन्त गंभीर असून अनुसूचित जातीवर अन्याय करणारी आहे,त्यामुळे तातडीने ही प्रक्रिया बंद करावी. वंचित अध्यक्ष पोपटराव सरोदे यांनी अनुसूचित जातीमध्ये तेढ निर्माण करण्याचे काम हे सरकार करत आहे. काँग्रेसचे अंजुम पटेल यानी उपवर्गीकरणामुळे राज्यातील अनुसूचित जातीमध्ये तीव्र असंतोष पसरला असून लवकरच याविरोधात मोठे आंदोलन उभारणार असे स्पष्ट केले. निवेदनावेळी वंचितचे उपाध्यक्ष संदीप क्षीरसागर, महासचिव गणपत मोरे,युवा नेते हरीश चक्रनारायण,संजय वाघमारे,काँग्रेसचे सतीश तऱ्हाळ,गोरक्षनाथ काळे, संजय होडगर आदी उपस्थित होते.यावेळी तहसीलदार यांनी निवेदन स्वीकारले.

## शंभू महादेव यात्रेनिमित्त झेंडा मिरवणूक उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान:** येथे सोमवार दि. २० एप्रिल रोजी यात्रोत्सवाच्या पहिल्या दिवशी गावातील माळेवाडी परिसर, वार्ड नंबर ६ येथील तुळजाभवानी मित्र मंडळ व जय मातादी मित्र मंडळाच्या वतीने गावाचे आराध्य दैवत शंभू महादेव यात्रोत्सवानिमित्त मानाची झेंडा मिरवणूक काढण्यात आली. याप्रसंगी ज्येष्ठ ग्रामस्थ श्रीधर गाडे, तंटामुक्तीचे अध्यक्ष आबासाहेब रणनवरे, मुकुंद हापसे, पत्रकार अर्जुन राऊत, अनिल दाभाडे, गणपत डुकरे, आदी मान्यवरांच्या हस्ते शंभू महादेव, प्रभू श्रीराम यांच्या प्रतिमेचे पूजन करून श्रीफळ वाढवून झेंडा मिरवणुकीस सुरुवात करण्यात आली. या मंडळाने सलग तीन वर्षापासून शंभू महादेव यात्रोत्सवानिमित्त झेंडा मिरवणुकीची परंपरा सुरू ठेवली असून यामध्ये परिसरातील मोठ्या संख्येने तरुण युवक, शिवभक्त आनंदाने सहभागी होतात.या झेंडा मिरवणुकी प्रसंगी मोठ्या संख्येने तरुण युवक मंडळाचे सदस्य व शिवभक्त उपस्थित होते. झेंडा मिरवणुकीबद्दल यात्रा कमिटीच्या वतीने दोन्ही मंडळाचा श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.



## नगरसेविका सुरेखा राक्षे यांची जनआरोग्य समितीच्या अध्यक्षपदी निवड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**कोपरगाव :** नगरपालिकेच्या नगरसेविका सुरेखा विनोद राक्षे यांची प्राथमिक आरोग्य केंद्र कोपरगाव येथे जन आरोग्य समितीमध्ये अध्यक्षपदी नुकतीच निवड झाली असून त्यांचे सर्वस्तरावर अभिनंदन होत आहे. कोपरगाव नगरपालिकेमध्ये युवानेते विवेक कोल्हे तसेच नगराध्यक्ष पराग संधान यांच्या मार्गदर्शनाखाली सुरेखा विनोद राक्षे या नगरसेविका म्हणून अतिशय उत्कृष्ट कार्य करत असून महिला नगरसेविका म्हणून त्यांनी कोपरगाव नगरपरिषदेच्या वाटचालीत काम सुरू आहे.या दरम्यान त्यांनी महिला कल्याण कामांसाठी अनेक समाजहिताच्या बाबींसाठी पुढाकार घेतलेला आहे.त्यांनी केलेल्या कार्याचा गौरव म्हणून महाराष्ट्र शासन तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाकडून नुकतेच राष्ट्रीय शहरी अभियानाच्या अंतर्गत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र कोपरगाव जन आरोग्य समितीमध्ये अध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी दिली आहे. त्यामुळे नगरसेविका सुरेखा राक्षे यांचे कोपरगाव शहरातून सर्व स्तरावरून कौतुक होत असून एक महिला म्हणून कोपरगाव नगरपरिषदेमध्ये त्यांचे कार्य कौतुकास्पद आहेच,त्यामुळे राज्य शासनाने त्यांच्यावर जन आरोग्य समितीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी टाकली आहे ही कौतुकास्पद बाब आहे.

## जयंती महिला एकता समितीच्यावतीने आज भिमगितांचा कार्यक्रम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्ताने जयंती महिला एकता समितीच्यावतीने आज मंगळवार दि. २१ एप्रिल रोजी संध्याकाळी ७ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर कलर्स मराठी इंडियन आयडॉल सुर नवा ध्यास फेम महागायक अविनाश कदम व प्रसिद्ध महागायिका गायत्री शेलार यांचा जल्लोष भिमाचा हा भिमगितांचा कार्यक्रम व राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा आयोजित केला असल्याची माहिती एकता समितीच्या अध्यक्षा रमादेवी धिवर व प्रसिद्धी प्रमुख ॲड. मिलिंद धिवर यांनी दिली आहे.

प्रमुख अतिथी म्हणून माजी खा. सुजय विखे पा., माजी नगराध्यक्षा अनुराधा आदिक, धनश्रीताई विखे, माजी शिक्षण उपसंचालक रामचंद्र जाधव, माजी नगराध्यक्ष संजय फंड, माजी सभापती दिपक पटारे, रिपाइचे जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात, विभागीय प्रमुख भिमाभाऊ बागुल, भाजपचे जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, ज्येष्ठ कामगार नेते नागेश सावंत, मनोज नवले व प्रा. अनिल बागुल यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये होणार असल्याची माहिती प्रसिद्धी प्रमुख ॲड. मिलिंद धिवर यांनी दिली आहे.

यावेळी सामाजिक कार्याची दखल घेऊन माजी उपसरपंच तथा विद्यमान सदस्य रांजणखोल ग्रामपंचायत श्रीमती सविता सिद्धार्थ बागुल यांना संघर्षमाता त्यागमाता मातोश्री रमाई आंबेडकर राज्यस्तरीय पुरस्कार, दमाणी हॉस्पिटल येथील कंपाऊंडर तथा आरोग्य सेवक वाल्मिक पंढरीनाथ डोंगरे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय आदर्श आरोग्य सेवक जिवणगौरव पुरस्कार, हिंद सेवा मंडळाचे अधिक्षक निलेश हिरालाल क्षीरसागर यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार, माता रमाई प्रतिष्ठाण, टिळकनगरच्या अध्यक्षा पुनम ब्राम्हणे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर महिला समाजभूषण राज्यस्तरीय पुरस्कार व बिल्डींग कॉन्ट्रॅक्टर हबीब बालदार शहा यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श समाजसेवक राज्यस्तरीय पुरस्कार देवून आदींना गौरविण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन जयंती एकता समितीच्या उज्वलाताई येवलेकर, ज्योतीताई पलघडमल, सुनिताताई वढणे, पुनम जाधव, आशा पाळंदे, शशिकला शरणागते, रुबीना पठाण, गिरीजा शिंदे, मुमताज सय्यद, शोभाताई पातारे, अनिता नरोडे, अलिशा बारसे, अनिता बारसे, उषा पाखरे, अंजनाताई पारखे, योजना दिवे, विजयाताई वायकर, अलोक थोरात, सचिन पाळंदे, श्रीकांत भालेराव, आकाश दिवे आदींनी केले आहे.

## निधन वार्ता

### भामाबाई कापसे



**श्रीरामपूर, :** तालुक्यातीलभेर्डापूर येथील भामाबाई भाऊसाहेब कापसे (वय ९० वर्षे) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. भेर्डापूर सोसायटीचे माजी संचालक बाबासाहेब कापसे व प्रगतशील शेतकरी दिलीप कापसे यांच्या त्या मातोश्री होत. त्यांचे पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे व पतवंडे असा मोठा परिवार आहे.

**change of name**

Old name: HAINBANU JAMILKHA PATHAN IS ON MY SCHOOL LIVING CERTIFICATE. and My New Name is SHAHIN RASHID SHAIKH as on Aadhar Card Number is 2730 4740 3047 (20/04/202

## कांद्याची आवक वाढल्याने भाव गडगडले; आवक ६८८९ गोणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर. :** श्रीरामपूर कृषि उत्पन्न बाजार समितीत गावरान कांद्याला ११०० रुपये बाजारभाव जाहीर झाला असून काल गावरान कांदा ६८८९ गोण्यांची आवक झाली आहे, आवक वाढली असली तरीभाव मात्र गडगडले आहे, अशी माहिती बाजार समितीचे सभापती सुधीर नवले व प्र. सचिव साहेबराव वाबळे यांनी दिली.

श्रीरामपूर कृषि उत्पन्न बाजार समितीत काल ६८८९ गोण्यांची आवक झाली असून कांदा नंबर एक - ९०० ते ११०० , कांदा नंबर दोन - ६०० ते ८५०, कांदा नंबर तीन - ४०० ते ५५०, गोल्टी - ४०० ते ७००, खाद - २०० ते ३५० असे भाव जाहीर झाले असल्याची माहिती सभापती सुधीर नवले, प्र. सचिव साहेबराव वाबळे यांनी दिली.

## मानवता एकता दिनानिमित्त शुक्रवारी रक्तदान शिबीर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** येथील संत निरंकारी चॅरिटेबल फाऊंडेशनच्यावतीने मानव एकता दिनानिमित्ताने शुक्रवार दि.२४ एप्रिल २०२६ रोजी येथील संत निरंकारी सत्संग भवन येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. उद्घाटन अशी माहिती राजकुमार माटा यांनी दिली. शिबिराचे डॉ. दिलीप शिरसाठ व सद्गुरू माता यांचे शिष्य व ज्ञान प्रचारक श्रीधर पाटील यांच्या हस्ते होणार आहे. सकाळी ९.३० तेसायंकाळी ४ या वाजेपर्यंत रक्तदान शिबीर सुरू राहिल. तर सकाळी ११ ते १ या वेळेत सत्संगाचे आयोजन करण्यात आले. तरी शिबिरात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घ्यावा, असे आवाहन श्याम वधवा, योगेश माटा यांनी केले आहे.

# शासनाच्या योजनाचा लाभ घ्या पण एजंटांना बळी पडू नका : आ खताळ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** केंद्र आणि राज्य सरकारच्या अनेक कल्याणकारी योजना आहेत. या सर्व योजनांवर सर्वसामान्य जनतेचा हक्क आहे त्या योजनांचा लाभ घेण्यासाठी कोणालाही पैसे देण्याची अजिबात गरज नाही. कोणत्याही एजंटच्या माध्यमातून काम करू नका. कुणी तुमच्याकडे पैसे मागत असेल थेट संपर्क साधा, संबंधितांवर कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा आ. अमोल खताळ यांनी दिला

संगमनेर शहरातील मातोश्री लॉन्स या ठिकाणी बांधकाम कामगारांना आ. अमोल खताळ यांच्या हस्ते साहित्य वाटप करण्यात आले त्यावेळी बांधकाम कामगारांना मार्गदर्शन करताना आमदार खताळ म्हणाले की, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री व शिवसेना पक्षाचे मुख्य नेते एकनाथ शिंदे तसेच राष्ट्रवादीच्या अध्यक्षा व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार तसेच अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पा यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील महायुती सरकार हे कामगार,महिला शेतकरी,व तरुण यांच्यासह प्रत्येक घटकाच्या विकासासाठी काम करत आहे.या सरकारच्या माध्यमातून नुसते बांध काम कामगारांनाच मदत केली जात नाही तर घरेलू कामगार यांनाही अर्थसहाय्य दिले जात आहे.

बांधकाम कामगार सहायक आयुक्त रेवनाथ भिसले यांनी प्रास्ताविक केले सरकारी कामगार अधिकारी स्वप्निल जाधव दुकाने निरीक्षक ललितदाभाडे यांनी बांधकाम योजनेबद्दल माहिती दिली यावेळी शिवसेना शहरप्रमुख विनोद सुर्यवंशी भाजप तालुका प्रमुख गुलाब भोसले यांनी मनोगत व्यक्त केले.



**संगमनेर तालुक्यामध्ये नोंदणीकृत बांधकाम कामगारांची संख्या २४ हजार १२६ असून विविध योजनांद्वरे हजारो कामगारांना लाभ मिळाला आहे. शिष्यवृत्ती योजनेतून ६ हजार ८७७ लाभार्थ्यांना सुमारे ७ कोटी ६० लाख रुपयांची मदत खात्यावर जमा करण्यात आली आहे. तसेच सुरक्षा संच,अत्यावश्यक वस्तू संच इत्यादीचा लाभ मिळत असल्याचे आ. अमोल खताळ यांनी सांगितले.**

## नशिबाची परिक्षा

**मंगळवार दि .२१ एप्रिल २०२६**

### मिलनम डे

उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत

१३७ १२८ १०० | १-९ | १२६ १८० २७० | जोड १२-६९-०३-८५-९७

### कल्याण

उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत

१४७ २०० ११० | २-५ | १४० १५९ ११३ | जोड २९-१५-३४-७६-५८

### मुंबैम (मेन)

उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत

४८० ५७० ६६० | २-९ | १२६ १८० ११७ | जोड २१-०९-३५-६७-९४

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | 460 02 499 | 127 02 138 | 670 38 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 34 356 | 455 46 178 | 569 03 788 | 130 46 240 | 330 64 167 |
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |
| 06/04/2026 to 10/04/2026 | 133 70 226 | 145 02 778 | 135 98 477 | 350 82 156 | 124 78 468 |
| 13/04/2026 to 17/04/2026 | 569 06 150 | 149 43 670 | 239 45 500 | 133 77 890 | 260 85 140 |

✻ वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये ✻

# काकांप्रमाणेच दुसऱ्यांच्या विचारांत जीवंत रहा : डॉ.विश्वास

## स्व.अरुणकाका जगताप यांच्या स्मरणार्थ 'अपने अपने राम' राम कथेत भाविक मंत्रमुग्ध

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**





**अहिल्यानगर –** श्रीराम व श्रीकृष्ण आले अन गेले ही. विश्व त्यांच्या शोकात राहिले नाही. त्यामुळे मृत्यू कोणालाही चुकलेला नाही, मात्र, मृत्यूपासूनही वाचता येते व दुसऱ्याच्या विचारात जिवंत राहता येऊ शकते. पण, त्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी व छत्रपती शिवरायांसारखे लोकोत्तर जीवनकार्य करा, असे आवाहन प्रसिद्ध कवी व रामकथाकार डॉ.कुमार विश्वास यांनी अहिल्यानगरमध्ये केले. स्व.अरुणकाका जगताप यांनी अहिल्यादेवी व छत्रपती शिवरायांच्या विचारांवर आयुष्यभर सामाजिक व धार्मिक काम केल्यानेच ते अहिल्यानगरवासियांच्या मनात व विचारात आजही जिवंत आहेत, असा विश्वासही यांनी व्यक्त केला.

माजी आमदार स्वर्गीय अरुणकाका जगताप यांच्या प्रथम वर्षश्राद्धानिमित्त येथील काका ट्रस्ट व जगताप परिवाराच्या वतीने डॉ. कुमार विश्वास यांच्या 'अपने अपने राम' या प्रसिद्ध राम कथेचे आयोजन आनंदधाम रस्त्यावरील राष्ट्रीय पाठशाळा मैदानात करण्यात आले आहे. त्याचे प्रथम पुष्प गुंफताना डॉ. विश्वास यांनी राम कथा कशी प्रत्येकाच्या जीवनाशी निगडित आहे याचे दाखले देत सविस्तर विवेचन केले. राम काठेह्च्या उद्घाटनप्रसंगी विधान परिषदेचे सभापती प्राध्यापक राम शिंदे, भाजपा प्रदेश उपाध्यक्ष डॉ.सुजय विखे, आमदार सत्यजित तांबे, जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष चंद्रशेखर घुले, पद्मश्री पोपटराव पवार, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव आदी उपस्थित होते. रामकथेचे कथाकार डॉ. कुमार विश्वास यांचे नगरवासीयांच्या वतीने स्वागत व सन्मान श्रीमती पार्वतीबाई जगताप यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची मूर्ती देऊन केले. यावेळी डॉ.वंदना फाटके, डॉ. शशीकांत फाटके, सचिन जगताप, आ.संग्राम जगताप, सुवर्णा जगताप, शितल जगताप, परमेश्वरी व आराध्य जगताप आदींसह जगताप परिवाराने केले. यावेळी रा.स्व.संघाचे जिल्हा संघचालक वाल्मिक कुलकर्णी, मंदारबुवा रामदासी, अनुराधा नागवडे, बडीसाजन ओसवाल संघाचे अध्यक्ष पेमराज बोथरा, सुनील रामदासी, राजेंद्र चोपडा आदींसह विविध क्षेत्रातील नागरिक व हजारो भाविक उपस्थित होते.

यावेळी डॉ.कुमार विश्वास यांनी विवेचनातून रामकथेतील अनेक जीवन दाखले दिले. त्यांनी प्रभू श्रीरामांच्या जीवनातील विविध पैलू अत्यंत समर्पक, आधुनिक संदर्भासह व तत्वज्ञानात्मक दृष्टिकोनातून उलगडले. 'अपने अपने राम' या संकल्पनेद्वारे प्रत्येकाच्या जीवनात रामाचे वेगवेगळे अर्थ कसे प्रकट होतात, याचे त्यांनी सखोल विश्लेषण केले. त्यांच्या कथनातून राम म्हणजे केवळ धार्मिक श्रद्धेचा विषय नसून आदर्श आचरण, कर्तव्यनिष्ठा, संयम, त्याग व मूल्याधिष्ठित जीवनपद्धतीचे प्रतीक असल्याचा संदेश प्रभावीपणे मांडण्यात आला. डॉ. विश्वास यांच्या भजनांना उपस्थित श्रोत्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. काव्य, विनोद, तत्त्वज्ञान व जीवनमूल्यांचा सुंदर संगम असलेल्या या रामकथेमुळे संपूर्ण वातावरण राममय, भक्तिमय व प्रेरणादायी झाल्याने डॉ. विश्वास यांच्या या अभ्यासपूर्ण विवेचनाने उपस्थित हजारो भाविक मंत्रमुग्ध झाले.

प्रारंभी प्रास्ताविकात आ.संग्राम जगताप यांनी सर्वांचे स्वागत करून कथा आयोजना मागचा उद्देश स्पष्ट केला.

डॉ. विश्वास यांची राम कथा सुरू होण्यापूर्वी त्यांच्या समवेत आलेले गायक कलावंत नीरजा उपरेती, प्रियांशा शहा , अंकिशा श्रीवास्तव यांनी श्रीरामांचे सुरेल भजने सादर करून वातावरण भक्तिमय करत उपस्थित भाविकांना मंत्रमुग्ध केले. प्रा.प्रसाद बेडेकर व सुशील कुशलेंद्र यांनी सूत्रसंचालन केले. रामकथेच्या यशस्वीतेसाठी काका ट्रस्टचे राजेश भंडारी, नगरसेवक विकी जगताप, अनिल मुरकुटे, गणेश गोंडाळ, शशीकांत घीगे, अजित जगताप, अनुप काळे आदींसह शेकडो कार्यकर्त्यांनी नियोजन केले. उपस्थित सर्व भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

# अन्नसुरक्षा अधिकाऱ्याविरुद्ध कारवाईची मागणी; अन्यथा आंदोलनाचा इशारा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**एरंडगाव :** अहिल्यानगर जिल्ह्यात कार्यरत असलेले अन्नसुरक्षा अधिकारी राजेश बडे यांनी अधिकाराच्या कक्षेबाहेर जाऊन केलेल्या कार्यवाहीबाबत गंभीर आक्षेप घेत त्यांच्या विरोधात तात्काळ कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री सचिवालय, नाशिक विभागाकडे निवेदन सादर करण्यात आले आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, काही दिवसांपूर्वी शेवगाव येथे दूध तपासणीसाठी छापा टाकण्यात आला होता. मात्र संबंधित नमुन्यांचा प्रयोगशाळेचा अंतिम अहवाल प्रलंबित असतानाही अन्नसुरक्षा अधिकारी बडे यांनी घाईघाईने पत्रकार परिषद घेऊन दूधामध्ये कोणतीही भेसळ आढळली नसल्याचे जाहीर केले. या वक्तव्यामुळे जनतेमध्ये संभ्रम निर्माण झाला असून संबंधित दूध डेरी चालकाला अप्रत्यक्षपणे क्लीन चिट देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

ही कृती अन्न सुरक्षा व मानके अधिनियम तसेच शासकीय कर्मचारी आचारसंहितेचा भंग करणारी असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. प्रयोगशाळेचा अधिकृत अहवाल येण्यापूर्वी अशा प्रकारे खुलासा करणे नियमबाह्य व संशयास्पद असल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे.

यासोबतच संबंधित अधिकाऱ्यांच्या एकूण कामकाजाची सखोल चौकशी करावी, दोष सिद्ध झाल्यास कठोर कारवाई करावी, तसेच आवश्यक असल्यास फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

तसेच त्यांच्या मालमत्तेचीही चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, या मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास माहिती अधिकार महासंघाच्या वतीने कोणतीही पूर्वसूचना न देता अन्न व औषध प्रशासन कार्यालयासमोर घंटानाद आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# खा.लंके यांचा शनिवारी पारनेर दौरा

## प्रत्येक गटात जाऊन करणार निवडणुकीची 'फिल्डिंग' मजबूत



**पारनेर :** आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पारनेर तालुक्याचे राजकीय मैदान आता पूर्णपणे सक्रिय झाले आहे. खासदार निलेश लंके यांनी शनिवार दि. २५ एप्रिल रोजी तालुक्याचा विशेष दौरा आयोजित केला असून, या दौऱ्याच्या माध्यमातून ते निवडणुकीच्या रिंगणात उतरण्यापूर्वी प्रत्यक्ष जमिनीवरील परिस्थितीची चाचपणी करणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा प्रवक्ते मोहनराव रोकडे यांनी या दौऱ्याची अधिकृत माहिती देताना स्पष्ट केले की, हा दौरा केवळ औपचारिक नसून आगामी निवडणुकांसाठी कार्यकर्त्यांना सज्ज करण्याच्या उद्देशाने आखण्यात आला आहे.

शनिवार, २५ एप्रिल रोजी सकाळी पारनेर शहरातून सुरू होणारा हा दौरा तालुक्याच्या विविध भौगोलिक भागांना कव्हर करणार आहे. यामध्ये ढवळपुरी, टाकळी ढोकेश्वर, जवळा, निघोज आणि सुपा यांसारख्या प्रमुख जिल्हा परिषद गटांचा समावेश आहे. या प्रत्येक ठिकाणी खासदार लंके स्थानिक पदाधिकाऱ्यांशी संवाद साधून निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आवश्यक असलेल्या सूचना देतील. विशेषतः 'गट आणि गण' निहाय बांधणीवर त्यांचा भर असणार असून, उमेदवारी वाटप आणि प्रचाराच्या धोरणांबाबत या दौऱ्यात महत्त्वपूर्ण चर्चा होण्याची शक्यता आहे.

या दौऱ्याचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे 'निलेश लंके प्रतिष्ठान' आणि 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार पक्ष)' यांच्या वतीने होणारी विविध शाखांची उद्घाटने. या माध्यमातून खासदार लंके आपली संघटनात्मक ताकद अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न करत आहेत.

# एससी उपवर्गीकरणावरून श्रीगोंद्यात एल्गार

## 'निर्णय मागे घ्या, नाहीतर रस्त्यावर उतरू'

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**श्रीगोंदा :** अनुसूचित जातीमध्ये (एससी) उपवर्गीकरण करण्याच्या निर्णयाविरोधात श्रीगोंद्यात संतापाची लाट उसळली आहे. ऑल इंडिया पँथर सेनेने या निर्णयाविरोधात थेट एल्गार पुकारत, तात्काळ निर्णय मागे घ्या, अन्यथा तीव्र आंदोलन अटळ, असा स्पष्ट इशारा दिला आहे.

राज्याचे मुख्यमंत्री, सामाजिक न्याय मंत्री आणि मुख्य सचिव यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या निवेदनात या निर्णयावर कडाडून टीका करण्यात आली. हा निर्णय सामाजिक ऐक्यावर घाव घालणारा आहे; संविधानाच्या मूलभूत तत्त्वांना धक्का देणारा आहे, असे ठाम मत संघटनेने व्यक्त केले.आमच्या ताटाचे तुकडे करू नका; तुकडे झाले की ताट राहत नाही! या शब्दांत संतप्त भावना व्यक्त करत, उपवर्गीकरणामुळे अनुसूचित जातींमध्ये फुट पडेल आणि सामाजिक संघर्ष वाढेल, असा इशारा देण्यात आलाऑल इंडिया पँथर सेनेची मागणी एकदम क्लियर आहे निर्णय रद्द करा, नाहीतर आंदोलनाचा 'गेम ऑन'! आहे यासाठी संघटनेने लोकशाही मार्गाने आंदोलन उभारण्याची तयारी सुरू केली असून, पुढील काही दिवसांत या मुद्द्यावर राज्यभर वातावरण तापण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.अश्या आशयाचे निवेदन तहसीलदार याना देताना त्यांनी घोषणा दिल्या आहेत यावेळी जिल्हा उपाध्यक्ष अमर घोडके, वंचित बहुजन आघाडीचे भीमराव घोडके, मुकुंद सोनटक्के, अंबादास घोडके, संजय रनसिंग, पवन रणदिवे, ॲड. विनोद उजागरे, संतोष भोसले, दादाराम रनसिंग, नितीन जावळे यांच्यासह आंबेडकरवादी कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# तहसील कार्यालयात अस्वच्छतेचे साम्राज्य

## कर्मचाऱ्यांवर ठपका, नागरिकांचा संताप तीव्र

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**शेवगाव :** तालुक्याचे प्रशासकीय मुख्यालय असलेल्या शेवगाव तहसील कार्यालयात स्वच्छतेचा पूर्णतः बोजवारा उडाल्याचे चित्र समोर आले आहे. मुख्य प्रवेशद्वाराजवळील दिव्यांगांसाठीच्या रॅम्पवर कचऱ्याचे ढीग साचले असून, लगतच्या भिंती गुटखा व मावा थुंकल्यामुळे लालभडक झाल्या आहेत. 'स्वच्छ भारत अभियान' राबवणाऱ्या प्रशासनाच्याच दारात अस्वच्छतेचे चित्र दिसत असल्याने नागरिकांतून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

दररोज शेकडो नागरिक विविध कामांसाठी तहसील कार्यालयात येत असतात. मात्र, कार्यालयाच्या दर्शनी भागाचीच दुरवस्था झाल्याने प्रशासनाच्या निष्काळजीपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. रॅम्पच्या दोन्ही बाजूंना प्लास्टिक पिशव्या, कागदाचे तुकडे, पाण्याच्या रिकाम्या बाटल्या तसेच सुकलेला कचरा साचलेला दिसून येत असून परिसरात दुर्गंधीही पसरली आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, कार्यालयीन वेळेत बाहेरील व्यक्तींपेक्षा कर्मचाऱ्यांचाच वावर अधिक असतो. त्यामुळे थुंकणे व अस्वच्छता करणारे प्रकार कर्मचाऱ्यांकडूनच होत असल्याचा आरोप होत आहे. काही अधिकाऱ्यांकडूनच पान, गुटखा व मावा मागवण्याच्या सूचना दिल्या जात असल्याचेही प्रत्यक्ष अनुभवातून समोर आले आहे.

यासंदर्भात आदर्श गाव वाघोली येथील उमेश भालसिंग यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, तहसील कार्यालयातच स्वच्छतेच्या नियमांचे खुलेआम उल्लंघन होताना दिसत आहे. कर्मचारी व अधिकारी त्यांच्या दालनात तसेच खिडक्यांजवळ गुटखा, पान व तंबाखू सेवन करताना दिसतात. रक्षकच भक्षक झाले तर न्याय कुणाकडे मागायचा? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकू नये, असे नागरिकांना सांगितले जाते; मात्र त्याची अंमलबजावणी प्रथम शासकीय कार्यालयांतूनच होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

तसेच काही अधिकाऱ्यांकडून बाहेर जात असशील तर पान-मावा घेऊन ये अशा सूचना दिल्या जात असल्याचे आपण स्वतः ऐकले असल्याचा दावा त्यांनी केला. एकीकडे स्वच्छ भारत अभियान राबवले जात असताना अशा प्रकारच्या घटना अत्यंत दुर्दैवी असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. दरम्यान, या प्रकारामुळे तहसील प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, याची गंभीर दखल घेऊन तातडीने स्वच्छता मोहीम राबवावी व संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# विद्या मोटेना विधान परिषदेवर संधी द्यावी

## धनगर समाजाच्यावतीने चौंडी येथे दूग्धाभिषेक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**जामखेड :** शिवसेना नेत्या व अहिल्याकन्या ॲड. विद्या मोटे यांची शिवसेना पक्षाने विधान परिषदेवर संधी द्यावी यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मगाव चौंडी येथे अहिल्यानगर जिल्ह्यातील धनगर बांधवांच्या वतीने अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस दुग्ध अभिषेक करुन शिवसेना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना अहिल्यानगर जिल्ह्यातील धनगर समाजाच्या वतीने मागणी करण्यात आली.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंतीचे औचित्य साधत अहिल्याकन्या विद्या मोटे यांना शिंदे गटाकडुन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व शिवसेना पक्षाने विधान परिषदेवर संधी द्यावी अशी मागणी समस्त धनगर समाज बांधव अहिल्यानगर जिल्ह्याच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मगाव असलेल्या चौंडी येथे सोमवार दि २० एप्रिल २०२६ रोजी अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस दुग्ध अभिषेक करुन करण्यात आली.

यावेळी महाराजा यशवंतराव होळकर राज्याभिषेक सोहळा समितीचे सदस्य पांडुरंग माने यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, विद्या मोटे यांच्या मागिल कार्यकाळात जे मोठे समाजकार्य करण्यात आले त्याची दखल घेत धनगर समाज बांधव त्यांच्या पाठीशी उभा आहे. शिवसेनाचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अहिल्याकन्या विद्या मोटे यांना विधान परिषदेवर संधी देऊन समस्त धनगर बांधवांच्या मनावरती राज्य करावे. तसेच शिवसेनेच्या कोट्यातून उच्चशिक्षित विद्या मोटे विधानपरिषद गेल्यास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा महाराष्ट्रातील धनगर बांधवांच्या वतीने चोंडी येथे ३१ मे रोजी येतोचित भावी दिव्य अशा सत्कार करण्यात येईल. पहिली महिला धनगर समाजातील विधान परिषदेवरती जाणे हा महाराष्ट्रातील तमाम धनगर बांधवांसाठी आनंदाचा क्षण असेल. ३१ मे रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंतीचे औचित्य साधत एकनाथ शिंदे हे उच्च शिक्षित धनगर समाजाच्या महिलेला विधान परिषदेवरती नक्कीच संधी देतील आणि आमच्या अहिल्या चरणी नतमस्तक होऊन केलेल्या मागणीला नक्कीच यश द्याल असे देखील पांडुरंग माने यांनी सांगितले. चौंडी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस दुग्ध अभिषेक करण्यात आला यावेळी अहिल्यानगर जिल्ह्यातील धनगर बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### संभाव्य उमेदवारांच्या यादीत विद्या मोटे यांचे नाव आघाडीवर असल्याची चर्चा

विद्या मोटे या गेल्या काही वर्षात सामाजिक व राजकीय पातळीवर सक्रिय राहिल्या आहेत, विशेषतः धनगर समाजातील प्रश्न, महिला सक्षमीकरण आणि स्थानिक पातळीवरील संघटनात्मक कामामुळे त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांनी तळागाळाशी थेट संपर्क आणि संघटन कौशल्यामुळे शिवसेनेतील एक प्रभावी महिला चेहरा म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. त्यामुळेच विधानपरिषदेच्या संभाव्य उमेदवारांच्या यादीत त्यांचे नाव आघाडीवर असल्याचे बोलले जात आहे. आणि याच आनुशंगाने विद्या मोटे यांना विधानपरिषदेवर संधी देण्यात यावी यासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील धनगर समाज बांधवांच्या वतीने चौंडी येथे अहिल्यादेवींच्या प्रतिमेस दुग्ध अभिषेक करुन मागणी करण्यात आली.

## द•ख•ल

### मंथन प्रज्ञाशोधात अस्मिता उंडेची झेप



**श्रीगोंदा :** तालुक्यातील मढेवडगावच्या मातीतून पुन्हा एकदा टॅलेंटची कळी फुलली आहेआणि नाव आहे अस्मिता प्रदीप उंडे! उंडेमळा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची ही चिमुकली विद्यार्थिनी मंथन प्रज्ञाशोध परीक्षेत तब्बल २१२ गुण मिळवत थेट तालुका गुणवत्ता यादीत झेपावली आहे.

घरात अभ्यासाची शिस्त आणि शाळेत शिक्षकांचे भक्कम मार्गदर्शनहीच अस्मिताच्या यशाची 'सीक्रेट सॉस' म्हणायला हरकत नाही. रयतसेवक डॉ. प्रदीप जगदेव उंडे यांची ही कन्या असून तिला वर्गशिक्षक रामदास ठाकर आणि संतोष इंगावले यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.लहान गाव, मोठं स्वप्न, आणि त्याहून मोठी कामगिरी! अस्मिताची ही झेप इतर विद्यार्थ्यांसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरणार आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल लोकनियुक्त सरपंच प्रमोद शिंदे, उपसरपंच सुनिता उंडे, नागवडे कारखान्याचे संचालक सुभाष शिंदे तसेच शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मनोज सुपेकर यांनी तिचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

### ढोरजळगावने शाळेचे राज्यस्तरीय स्पर्धेत घवघवीत यश

**ढोरजळगांव :** शेवगाव तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ढोरजळगावने शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे . लक्ष्यवेध व मंथन या राज्यस्तरीय स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मोठे यश मिळविले आहे . शाळेतील सर्वच विद्यार्थ्यांनी या स्पर्धा परीक्षेत आपला ठसा उमठवला आहे . लक्ष्यवेध स्पर्धा परीक्षेत कु . समृद्धी सोपान सासवडे हिचा राज्यात सहावा क्रमांक आला आहे . तर मंथन परीक्षेत केंद्रात तिसरा क्रमांक आला आहे . कु. अक्षरा संदिप गिऱ्हे या विद्यार्थीनीचा लक्ष्यवेध परीक्षेत राज्यात सातवा क्रमांक आला आहे . तर मंथन परीक्षेत केंद्रात दुसरा क्रमांक आला आहे. कु. भक्ती किरण बुटे हिचा लक्षवेध परीक्षेत राज्यात अकरावा व जिल्ह्यात चौथा क्रमांक आला आहे. चि. यश रमेश फुलमाळी याने लक्ष्यवेध परीक्षेत केंद्रात प्रथम क्रमांक मिळविला आहे . चि.आदर्श विकास कराड याने मंथन परीक्षेत केंद्रात प्रथम क्रमांक मिळविला आहे . तसेच कु . आरोही प्रशांत खामकर हिने मंथन परीक्षेत केंद्रात पाचवा क्रमांक मिळविला आहे . विद्यार्थ्यांनी या विविध स्पर्धा परीक्षेत ठसा उमटविला आहे. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सदस्य , सरपंच व उपसरपंच,सोसायटी चेअरमन व व्हा. चेअरमन, पालक व ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले आहे.

### मंथन परीक्षेत व्यंकनाथ विद्यालयाची कु. सिद्धी शेंडे तालुक्यात प्रथम तर काळे अभिमन्यू द्वितीय

**लिंपणगाव :** मंथन राज्यस्तरीय सामान्य ज्ञान परीक्षेत श्रीगोंदा तालुक्यातील लोणी व्यंकनाथ येथील श्री व्यंकनाथ विद्यालयातील विद्यार्थ्यांची यशस्वी कामगिरी श्री व्यंकनाथ विद्यालय व जुनिअर कॉलेज या विद्यालयातील इयत्ता पाचवीतील विद्यार्थिनी कुमारी शेंडे सिद्धी धनंजय हिने २१२ गुण मिळवून मंथन परीक्षेत तालुका गुणवत्ता यादीत प्रथम स्थान पटकाविले,तर काळे अभिमन्यू दत्तात्रेय या विद्यार्थ्याने २०० गुण मिळवून तालुका गुणवत्ता यादीत दुसरा क्रमांक पटकावला. तसेच इयत्ता सातवीच्या वर्गातील काकडे जयदीप नामदेव या विद्यार्थ्याने देखील तालुका गुणवत्ता यादीत प्रथम स्थान पटकावले.

या यशाबद्दल नागवडे कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र दादा नागवडे, जिल्हा बँकेच्या संचालिका सौ अनुराधाताई नागवडे सर्व विश्वस्त मंडळ शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष डी आर काकडे व शालेय व्यवस्थापन समितीच्या सर्व सदस्य तसेच विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब जठार सर व सर्व शिक्षक वृंदातर्फे त्यांचा सत्कार करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

### नवदृष्टी मिळालेले मतदार बजावणार मतदानाचे हक्क

**अहिल्यानगर :** फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या वतीने मोफत नेत्र तपासणी शिबिर व मोतीबिंदू शस्त्रक्रियेच्या माध्यमातून नवदृष्टी मिळालेल्या ज्येष्ठ नागरिक व महिलांना मतदानाचे कर्तव्य बजावण्याचे आवाहन करण्यात आले. राहुरी पोटनिवडणुक आणि पुढील जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये देखील मतदानाचा हक्क बजावून सक्षम उमेदवार निवडून देण्याचे स्पष्ट करण्यात आले. राहुरी पोटनिवडणुकीत ज्या गावात शंभर टक्के मतदान होईल त्या ग्राम पंचायतला संस्थेच्या वतीने ५१ हजार रुपयाचे बक्षीस देऊन सन्मान केला जाणार असल्याची माहिती फिनिक्सचे संस्थापक जालिंदर बोरुडे यांनी दिली.

फिनिक्स सोशल फाउंडेशनने मोफत नेत्र तपासणी शिबिराबरोबरच सामाजिक बांधिलकी जपत एक आगळा-वेगळा मतदार जागृतीचा उपक्रम हाती घेतला आहे. नागरदेवळे (ता. नगर) येथे नुकतेच आयोजित करण्यात आलेल्या या मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिरास महिलांसह ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला. या शिबिराच्या माध्यमातून मोतीबिंदू व काचबिंदूग्रस्त रुग्णांची तपासणी करून, त्यांची मोफत शस्त्रक्रिया पुणे येथील के. के. आय. बुधराणी रुग्णालयात यशस्वीरीत्या करण्यात आली. शस्त्रक्रियेनंतर दृष्टी परत मिळालेल्या रुग्णांचे शहरात आगमन होताच फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले.

फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांनी नवदृष्टी मिळालेल्या ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधत, या नव्या दृष्टीचा उपयोग केवळ स्वतःच्या जीवनातच नव्हे, तर लोकशाही बळकट करण्यासाठी मतदानाचा हक्क बजावण्यासाठीही करावा, असे आवाहन केले.

## द • ख • ल

### कलगीतुरा शाहिरीचा पहाडी आवाज काळाच्या पडद्याआड



**वळती :** महाराष्ट्राच्या मातीतील अस्सल लोककला 'कलगीतुरा' घराघरांत पोहोचवणारे ज्येष्ठ शाहीर रामदास नाथाजी गुंड यांचे शनिवारी (दि. १८) हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या निधनामुळे कलगीतुरा शाहिरी परंपरेतील अभ्यासू, पहाडी आवाजाचा एक दिग्गज लोककलावंत काळाच्या पडद्याआड गेला असून कला क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे. रामदास नाथाजी गुंड यांचे मूळ गाव अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील काटाळवेढे हे होते. तसेच वळती, रांजणी, थोरांदळे, शिगवे या परिसरात त्यांचे मोठे चाहतेवर्ग निर्माण झाला होता. या भागातील अनेक कार्यक्रमांतून त्यांनी आपल्या शाहिरी कलेची छाप उमटवली होती. राज्यभर विविध ठिकाणी कार्यक्रम सादर करत त्यांनी कलगीतुरा लोककलेचा झेंडा उंचावला. केवळ मनोरंजनापुरती मर्यादा न ठेवता, त्यांनी आपल्या शाहिरीतून सामाजिक व धार्मिक प्रबोधन, अनिष्ट प्रथांवर प्रहार, तसेच संत-महापुरुषांच्या विचारांचा प्रसार केला. ग्रामीण भागात शिक्षणाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठीही त्यांचे योगदान उल्लेखनीय राहिले. रामदास नाथाजी गुंड यांच्या पार्थिवावर त्यांच्या मूळ गावी काटाळवेढे (ता. पारनेर) येथे रविवारी (दि. १९) अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व कला क्षेत्रातील मान्यवरांसह पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

### नंदा घाडगे यांचा स्व एकनाथ जगताप प्रतिष्ठानच्या वतीने सन्मान

**माळशिरस :** सासवडच्या चिंतामणी हॉस्पिटलमध्ये काम करणाऱ्या मावशी नंदा घाडगे यांना झाडलोट करताना दोन तोळ्यांची सोन्याची चेन पार्किंग जवळ सापडली. त्यांनी ती व्यवस्थापनाकडे सुपूर्द केली व नंतर ती मूळ मालकाला सुपूर्द करण्यात आली.. घाडगे यांच्या या प्रामाणिकपणाचे कौतुक म्हणुन सामाजिक कार्यात कायम अग्रभागी असणाऱ्या स्व एकनाथ काका जगताप प्रतिष्ठानच्या वतीने घाडगे यांना साडी चोळी व पाण्याचा फिल्टर भेट देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.. मावशी नंदा घाडगे यांच्या या कौतुक सोहळ्यास स्व एकनाथ जगताप प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष जगताप, सचिव हेमंत ताकवले, चिंतामणी हॉस्पिटलचे संचालक डॉ बाळासाहेब वांढेकर, डॉ विनायक बांदेकर, डॉ संध्या खळदकर, डॉ भालचंद्र दीक्षित, कृष्णा शेट्टी,शहर पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष जीवन कड, सदस्य जगदीश शिंदे, पथॉलॉजि लॅबचे पांडुरंग गायकवाड,परिचारिका राजश्री शिवरकर, नुतन गोसावी आदी मान्यवर उपस्थित होते.. सर्वच उपस्थितांनी घाडगे यांच्या या प्रामाणिक व स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करत अभिनंदन केले...



### कासारी तळेगाव रस्त्यावर दुचाकीला धडकून टँकर उलटला

**तळेगाव ढमढेरे :** कासारी (ता. शिरूर) येथील तळेगाव रस्त्याने भरधाव वेगाने चाललेला टँकर रस्त्यावरील वळणावर टँकर चालकाचा ताबा सुटल्याने टँकर दुचाकीला धडकून उलटल्याची घटना घडली असून या अपघातात दुचाकी चालक नवनाथ राजाराम तांबे हे गंभीर जखमी झाल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे टँकर चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कासारी (ता. शिरूर) येथील कासारी तळेगाव रस्त्याने नवनाथ तांबे हे त्यांच्या ताब्यातील एम एच १२ पी जि ९९१३ या दुचाकीहून तळेगाव ढमढेरे बाजूने कासारीच्या दिशेने चाललेले असताना कासारी बाजूने भरधाव वेगाने आलेल्या एम एच १२ एस एक्स ४५७२ या टँकर चालकाचा वळणावर टँकर वरील ताबा सुटल्याने टँकर थेट दुचाकीला धडकून रस्त्याच्या कडेला मोकळ्या खड्ड्यात उलटला घटनेची माहिती मिळताच पोलीस शिपाई नागेश वाघमारे यांसह आदींनी घटनास्थळी धाव घेत वाहतूक कोंडी सुरळीत केली, त्यानंतर काही वेळाने क्रेनच्या सहाय्याने उलटलेला टँकर सरळ करण्यात आला मात्र सदर अपघातात दुचाकी चालक नवनाथ राजाराम तांबे हे गंभीर जखमी झाले असून याबाबत गोरख बाबुराव तांबे यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद् दिल्याने पोलिसांनी टँकर चालक नवनाथ दूरगुडे याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार अमोल चव्हाण हे करत आहे.



कासारी (ता. शिरूर) येथील तळेगाव रस्त्यावर दुचाकीला धडकून उलटलेला टँकर.(छायाचित्र आकाश भोरडे)

# एल निनोच्या पार्श्वभूमीवर खरीप हंगामात सूक्ष्म नियोजनावर भर द्या : कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** यंदाच्या हवामान अंदाजानुसार एल निनोचा प्रभाव असण्याचा अंदाज वर्तवण्यात आला असून त्याचा शेती क्षेत्रावर होणाऱ्या संभाव्य परिणाम, पर्जन्यमानाची स्थिती आणि त्यानुसार पीकपद्धतीचे नियोजन करावे, त्यामुळे येत्या खरीप हंगामात शेतकऱ्यांना खते व बियाणे वेळेत आणि पुरेशा प्रमाणात उपलब्ध होतील , यादृष्टीने आवश्यक सुक्ष्म नियोजन करावे. शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या वितरक आणि दुकांनदारावर कारवाई करावी, असे निर्देश राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले.

छत्रपती शाहू संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेच्या (सारथी) सभागृहात खरीप हंगाम २०२६ च्या नियोजनसंदर्भात आयोजित राज्यस्तरीय कार्यशाळेत ते बोलत होते. कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचे प्रकल्प संचालक मीनल करनवाल (दूरदृष्यप्रणालीडरे) तर महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक दिलीप स्वामी, कृषी आयुक्त सूरज मांढरे, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे आदी उपस्थित होते.

गतवर्षी अतिवृष्टीमध्ये बाधित झालेल्या शेतकऱ्यांचे पंचनामे करुन मदत मिळेपर्यंत कृषी विभागाने अतिशय चांगले काम केल्याबद्दल श्री. भरणे यांनी अभिनंदन केले. ते पुढे म्हणाले, कृषी विभागाकडून शेतकऱ्यांच्या मोठ्या अपेक्षा असतात, त्यांचा विभागावर मोठ्याप्रमाणात विश्वास असतो. कृषी विभागाचा सल्ल्यानुसार ते शेती करीत असतात, त्यामुळे अधिकाऱ्यांने शेतकऱ्यांच्या बांधावर जावून मार्गदर्शन करावे. त्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी सदैव तत्पर असले पाहिजे.

शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे मिळण्यासोबतच त्यांची फसवणूक टाळण्याच्यादृष्टीने बियाणांची तपासणी वेळेत करावी. निकृष्ट दर्जाच्या बियाण्यासंदर्भात तक्रार प्राप्त झाल्यास संबंधितांवर ताबडतोब कार्यवाही करावी. तसेच युद्धजन्य परिस्थितीचा विचार करता खतांचा साठा होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी. युद्धजन्य परिस्थितीमुळे युरिया खताची टंचाई भासल्यास शेतकऱ्यांना पर्यायी खताचा वापर करण्याबाबत तपासणी करावी,जलंसधारणाच्या कामाला प्राधान्य द्यावे.




प्रतिकुल हवामान, अवेळी पडणारा पाऊस, अतिवृष्टीच्या धर्तीवर कृषी विद्यापीठाने संशोधन करुन शेतकऱ्यांचे उत्पादन वाढीच्यादृष्टीने नवनवीन वाण उपलब्ध करुन दिले पाहिजे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळाला पाहिजे, शेतकऱ्यांचे उत्पादनात वाढ होण्यासोबतच त्यांचे आर्थिक सक्षमीकरण करण्याच्यादृष्टीने सामूहिक प्रयत्न करावे.

आगामी खरीप हंगाम २०२६ च्या पार्श्वभूमीवर कृषी विभागाने तयारीला सुरुवात केली असून या अनुषंगाने राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेत शंकाचे निरसन करण्यात यावे, माहितीची देवाण-घेवाण करावी, विधायक सूचना कराव्यात, शेतकऱ्यांना येणाऱ्या अडीअडचणीवर मात करण्यासाठी उपायोजना कराव्यात, त्याची कृषी आयुक्तालयाच्यावतीने नोंद घेवून कार्यवाही करण्यात येईल, असेही श्री. भरणे म्हणाले.

कृषी आयुक्त सूरज मांढरे म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत 'एल निनो' संदर्भात आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती, त्यामध्ये कृषी विभागाचा आढावा सादर करण्यात आला आहे. जलसंधारणाची प्रलंबित कामे वेळेत पूर्ण करावी, वैरण विकास कार्यक्रम राबविण्याकरिता कृषी विभागाने अग्रेसर राहून कामे करावीत. ॲग्रीस्टॅक योजनेला आयएफएमएस पोर्टलशी संलग्न करावे. विविध योजनांचा लाभ शेतकऱ्यांना मिळाला पाहिजे, यादृष्टीने कामे करावीत, असेही श्री. मांढरे म्हणाले.

याकार्यशाळेत भारतीय हवामान शास्त्र विभाग, खरीप नियोजन -२०२६, महाबीज, कृषी विद्यापीठ सर्व संचालक (विस्तार), नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प आदींचे सादरीकरण करण्यात आले. खरीप हंगामासाठी करण्यात आलेल्या पूर्वतयारीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. जिल्हानिहाय खते व बियाण्यांचा साठा, वितरण व्यवस्था आणि संभाव्य मागणी याचाही आढावा घ्यावा.

## भारनियमन रद्द न झाल्यास ग्रामस्थांचा उपोषणाचा इशारा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस, पुरंदर :** तालुक्यातील पूर्व भागातील अनेक गावांतून गेली काही दिवस सायंकाळी सहा ते दहा या वेळेत घरगुती विद्युत पुरवठ्याचे भारनियमन करण्यात येत आहे याचा सर्वसामान्य नागरिकांना फार मोठा त्रास सहन करावा लागत आहे. सदरचे भारनियमन रद्द करण्यात यावे अशी मागणी या गावांतील नागरिकांनी केली आहे. आज (सोमवारी) या भागातील नागरिकांनी सासवड येथील महावितरणच्या कार्यालयात जाऊन कार्यकारी अभियंता भालचंद्र गवई यांना निवेदन दिले. येत्या १५ दिवसांत जर भारनियमन रद्द झाले नाही तर तालुक्यातील नागरिकांच्या वतीने कार्यालयाबाहेर आमरण उपोषण करण्याचा निर्धार या मंडळींनी व्यक्त केला आहे. जिल्हा परिषद सदस्य अजय इंगळे, पंचायत समिती सदस्य माऊली यादव यांसह विविध गावातील अनेक ग्रामस्थ याप्रसंगी उपस्थित होते भार नियमानामुळे विद्यार्थांच्या अभ्यासावर परिणाम होत आहे शिवाय सध्या कडक उन्हाळा असल्याने सर्वांना भार नियमानामुळे त्रास होत आहे. परिसरात चोऱ्यांचे



प्रमाण वाढले आहे या त्रासातून सुटका होण्यासाठी त्वरित भारनियमन रद्द करावे अशी मागणी निवेदनात केली आहे या पर्ा सरातील काही पोल्ट्री उद्योग तसेच फुलशेती करणारे शेतकरी वीज चोरी करत असून त्यांच्यावरही कडक कारवाई करण्याची मागणी या वेळी करण्यात आले. अशा व्यावसायिकांचे व स्थानिक वायरमनचे आर्थिक हित सबंध असल्याची तक्रार देखील यावेळी करण्यात आली. अंकुशबापू भगत, रोहिदास कड, संदिप देवकर, महेश राणे, बळीराम सोनवणे यांसह या भागातील अनेक ग्रामस्थ , शेतकरी या प्रसंगी उपस्थित होते.

याबाबत कार्यकारी अभियंता गवई यांनी सिंगलफेज विद्युत पुरवठा करत असताना काहीजण थ्रीफेज उपकरणे वापरत आहेत परिणामी लोड मर्यादा येऊन पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण वाढले आहे त्यामुळे अशा वीज चोरांवर कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे तसेच पोल्ट्री उद्योग व फुल शेती करणारे शेतकरी यांच्या अनधिकृत वीज जोड वर देखील तातडीने कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश गवई यांनी दिले आहेत. उपकार्यकारी अभियंता गणेश चांदणे, सहाय्यक अभियंता जीवन ठोंबरे या प्रसंगी उपस्थित होते

## संभाव्य एल निनोच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सज्ज पाणी नियोजन आणि जलसंधारणावर भर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** संभाव्य एल निनोच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने पूर्वतयारीला वेग दिला असून पाण्याचे सुयोग्य नियोजन, जलसंधारणाची कामे आणि जुन्या जलस्त्रोतांचे पुनरुज्जीवन यावर विशेष भर देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत राज्यातील परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. या बैठकीला कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी तसेच हवामान विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यांत एल निनोचा प्रभाव अधिक जाणवण्याची शक्यता असून यंदा सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज आहे. पावसातील अनियमिततेमुळे शेती आणि पिण्याच्या पाण्यावर परिणाम होऊ शकतो, अशी शक्यता व्यक्त करण्यात आली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, राज्यात सध्या पाणीसाठा समाधानकारक असला तरी योग्य नियोजन आवश्यक आहे. जलयुक्त शिवार आणि गाळमुक्त धरणगाळयुक्त शिवार योजनांची कामे तातडीने पूर्ण करून पाणी साठवण क्षमता वाढवावी. तसेच मनरेगा अंतर्गत जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य देण्याचे निर्देश त्यांनी दिले.

प्रत्येक जिल्ह्यात पाणी बचतीसाठी स्थानिक टास्क फोर्स स्थापन करून पाण्याचा काटेकोर वापर आणि साठवणूक सुनिश्चित करावी, असेही त्यांनी सांगितले. पुढील उन्हाळ्याचा विचार करून आतापासूनच नियोजन करण्यावर त्यांनी भर दिला. दरम्यान, पशुधनासाठी चारा टंचाई टाळण्यासाठी वैरण विकास कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या. विशेषतः सोलापूर, सांगली आणि मराठवाडा भागात यावर लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे.

खत पुरवठा आणि वितरण पारदर्शक करण्यासाठी 'ॲग्रीस्टॅक' प्रणालीचा वापर आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने देखरेख मजबूत करण्यावरही भर देण्यात येणार आहे. कृषिमंत्री भरणे यांनी सांगितले की, खरीप हंगामात शेतकऱ्यांना वेळेवर खते व बियाणे उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत. डीएपी खत वितरणाचे नियोजन करण्यात येत असून कृत्रिम टंचाई होऊ नये यासाठी तपासणी वाढविण्यात येणार आहे. शेततळे योजनेवर भर देऊन पाणी साठवण क्षमता वाढविण्याचेही नियोजन आहे.राज्य सरकार आणि कृषी विभाग संभाव्य एल निनोच्या संकटाचा सामना करण्यासाठी पूर्णपणे सज्ज असून शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी सर्व आवश्यक उपाययोजना राबविण्यात येत असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

## रॅगिंग हा दंडात्मक गुन्हा; कायद्याचे पालन केल्यानेच मिळते सुरक्षा : न्यायाधीश ए. एम. हुसेन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळेफाटा :** ''महाविद्यालयीन जीवनात रॅगिंगसारखे प्रकार घडता कामा नयेत, कारण हा एक दंडात्मक गुन्हा आहे. प्रत्येक महाविद्यालयात 'विशाखा समिती' स्थापन करणे कायद्याने अनिवार्य आहे. विद्यार्थ्यांनी कायद्याचे पालन केल्यास त्यांना खऱ्या अर्थाने सुरक्षा आणि स्वातंत्र्य मिळते,'' असे प्रतिपादन जुन्नरचे दिवाणी वरिष्ठ न्यायाधीश ए. एम. हुसेन यांनी केले.

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, पुणे यांच्या वार्षिक कार्यक्रम पत्रिकेनुसार, जुन्नर तालुका विधी सेवा समितीच्या वतीने 'अनंतराव कणसे होमिओपॅथीक महाविद्यालय आणि हॉस्पिटल, आळे' येथे कायदेविषयक जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.




जिल्हा न्यायाधीश एस. बी. शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर संपन्न झाले. यावेळी व्यासपीठावर जुन्नर तालुका वकील बार असोसिएशनचे अध्यक्ष वकील हेमंत हाडवळे, उपाध्यक्ष निलीमा शेरकर, कॉलेजचे चेअरमन डॉ. कमलेश घोलप, समन्वयक प्रशांत मोरतळे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी वकील वर्षा टिंगरे यांनी 'पी.सी.पी.एन.डी.टी.' (लिंग निवड प्रतिबंधक) कायद्यावर मार्गदर्शन केले.कौशल पादीर यांनी 'पोक्सो' (झजउडज) कायद्यांतर्गत शाळा-महाविद्यालयांमधील मुलांच्या सुरक्षिततेबाबत माहिती दिली. ॲड. आदेश घाटपांडे यांनी समाजातील महिलांची सुरक्षा आणि गोपनीयतेच्या अधिकारावर प्रकाश टाकला. वैशाली देवकर यांनी पीडित नुकसान भरपाई योजना आणि कैद्यांच्या कुटुंबीयांचे समुपदेशन या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद मुळाला

या शिबिराचे प्रास्ताविक बार असोसिएशनचे अध्यक्ष हेमंत हाडवळे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राशी मोरडीया यांनी केले, तर आभार प्रदर्शन तालुका विधी सेवा समितीचे समन्वयक प्रशांत मोरतळे यांनी मानले.

## भोरमध्ये बसवेश्वर महाराजांची ८९५ वी जयंती उत्साहात



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**भोर :** जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या ८९५ व्या जयंतीनिमित्त भोर शहरात विविध ठिकाणी भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात अभिवादन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. भोर नगरपालिका तसेच तहसील कार्यालय येथे मोठ्या उत्साहात जयंती साजरी करण्यात आली.

भोर नगरपालिकेत नगराध्यक्ष रामचंद्र आवारे ,उपनगराध्यक्षा अँड. जयश्री शिंदे यांच्या हस्ते बसवेश्वर महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी नगरसेवक अमित सागळे, जगदीश किरवे, तृप्ती सुपेकर, गणेश पवार, राजकुमार शिंदे, राजेंद्र शिंदे पालिका अधिकारी महेंद्र बांदल ,राजेंद्र राऊत आदी उपस्थित होते.शहरातील राजवाडा चौकातील तहसील कार्यालयातही जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. नायब तहसीलदार डॉ.अरुण कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी डॉ.अण्णासाहेब बिराजदार, डॉ. अरुण बुरांडे, डॉ. विद्या बुरांडे, डॉ. पुष्कर बिराजदार, प्रसाद महाजन, पूनम महाजन, विजयकुमार केरूर, संगीता केरूर, समाधान पैलवान, दमयंती पैलवान, स्वप्निल पैलवान, वैशाली पैलवान, शरद साळमळगी, सुरेखा साळमळगी, अक्षय राशिनकर, शैला बिराजदार, अनिल कुमार धरणे, अमित माळी तसेच लिंगायत समाज बांधव उपस्थित होते.याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी कायकवे कैलास (कष्ट हाच स्वर्ग) या विचारांचे महत्त्व अधोरेखित करत समता, लोकशाही आणि सामाजिक ऐक्याचा संदेश आचरणात आणण्याचे आवाहन केले. यावेळी डॉ. अरुण बुरांडे यांनी उपस्थितांना बसवेश्वर महाराजांवरील पुस्तके भेट देऊन विचारांचा प्रसार केला.

समतावादी विचारांचा जागर करत हा सोहळा मंगलमय वातावरणात संपन्न झाला असून या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसतर्फे राज्यस्तरीय विचारप्रधान अभियान

### शिवराज मोरे यांची पत्रकार परिषदेत माहिती; एक मे रोजी होणार उद्घाटन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे:** समाजातील सध्याच्या वैचारिक, सामाजिक आणि शैक्षणिक आव्हानांना उत्तर देण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या वतीने राज्यभरात पाच विचारप्रधान अभियानाची सुरुवात करण्यात येणार असून, लोकशाही संवाद व्यासपीठाची स्थापना केली जाणार आहे. युवकांना जागरूक, संघटित व सक्रिय करून समाजात परिवर्तन घडवण्याच्या उद्देशाने हे अभियान महत्वाचे ठरणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष शिवराज मोरे यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रसंगी प्रदेश उपाध्यक्ष प्रथमेश आबनावे, प्रदेश सरचिटणीस भूषण रणभरे, पिंपरी चिंचवड युवक काँग्रेस अध्यक्ष कौस्तुभ नवले, प्रदेश सचिव अभिषेक अवचार, प्रियंका चौधरी आदी उपस्थित होते.

> महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसने युवकांना या अभियानात सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले असून, संविधानिक मूल्यांवर आधारित, विचारशील, समतामूलक आणि जागरूक समाज निर्माण करण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज व्यक्त केली आहे. 'युवक विचार करेल, तेव्हाच भारत बदलेल' हा नारा घेऊन आम्ही येत्या काळात काम करणार आहोत.
>
> **- शिवराज मोरे, अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस**

शिवराज मोरे म्हणाले, ''या उपक्रमांतर्गत डॉ. नरेंद्र दाभोलकर अभियान (वैज्ञानिक दृष्टिकोन), गोविंद पानसरे अभियान (सामाजिक न्याय), एम. एम. कलबुर्गी अभियान (विचार स्वातंत्र्य), रोहित वेमुला अभियान (विद्यार्थी समानता), गौरी लंकेश अभियान (सत्य व पत्रकारिता) असे पाच स्वतंत्र अभियान राज्यभर राबविण्यात येणार आहेत. डॉ. दाभोलकर अभियानाच्या माध्यमातून अंधश्रद्धा निर्मूलन आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार केला जाईल. गोविंद पानसरे अभियानांतर्गत संविधानिक मूल्ये, समता आणि सामाजिक ऐक्य यावर भर दिला जाईल. एम. एम. कलबुर्गी अभियानाडरे अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि विचारमुक्त संवादाला प्रोत्साहन दिले जाईल. रोहित वेमुला अभियान विद्यार्थ्यांमधील भेदभावविरोधी जागरूकता, समान संधी आणि मानसिक आरोग्य सहाय्य यावर लक्ष केंद्रित करेल, तर गौरी लंकेश अभियानाच्या माध्यमातून फेक न्यूजविरोधी जनजागृती, मीडिया साक्षरता आणि निर्भय पत्रकारितेला समर्थन दिले जाईल. सर्व शाळा, महाविद्यालये, ग्रामीण व शहरी भागात जनजागृती, संवाद, प्रशिक्षण आणि कृतीच्या माध्यमातून टप्प्याटप्प्याने ही अभियाने राबविण्यात येणार आहेत.''

यासोबतच, या सर्व अभियानांना एकत्र जोडण्यासाठी आणि समाजातील विविध स्तरांपर्यंत संवाद पोहोचवण्यासाठी १ मे, महाराष्ट्र दिनानिमित्त 'लोकशाही संवाद -डेमोक्रॅटीक डायलॉग' हा प्रमुख कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन होणार आहे. विविध क्षेत्रातील विचारवंत आणि सामाजिक कार्यकर्त्यांची उपस्थिती राहणार आहे. या संवादाच्या माध्यमातून पाचही अभियानांतील मूल्यांना एकत्रित व्यासपीठ मिळणार असून, समाजातील विविध घटकांमध्ये विचारांची देवाणघेवाण, जागरूकता आणि संघटनात्मक बळकटी निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे, असे शिवराज मोरे यांनी नमूद केले.

## बेकायदेशीर शुल्क प्रकरणी आयएलएसला झटका;

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** मुंबई उच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर आयएलएस विधी महाविद्यालयाकडून बेकायदेशीररित्या आकारलेली १,०४,८६३ रक्कम ६ टक्के व्याजासह परत करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मयूर सुहास गरुड यांच्या रिट याचिका क्र. ११५४६/२०२५ वर सुनावणीदरम्यान हा निर्णय झाला असून, उच्च शिक्षण संचालनालयाच्या चौकशीत शुल्क वसुलीत गंभीर अनियमितता उघडकीस आल्या आहेत.

चौकशीत महाविद्यालयाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या तरतुदींचे उल्लंघन करून मंजूर शुल्क रचनेबाहेरील १७ ते १९ अनधिकृत शुल्क मथळ्यांखाली दरवर्षी ३४,००० ते ४२,००० अतिरिक्त शुल्क आकारल्याचे स्पष्ट झाले. संबंधित विद्यार्थ्याकडून एकूण १,०४,८६३ इतकी रक्कम वसूल करण्यात आली होती.

माहिती अधिकारातून मिळालेल्या आकडेवारीनुसार, २०१९-२० ते २०२३-२४ दरम्यान महाविद्यालयाने २९.६४ कोटी उत्पन्न मिळवले.

## खोट्या ए टी सी परवानग्यांवर पुण्यात उंच इमारतींना मंजुरीचा आरोप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** पुणे महानगरपालिकेत बांधकाम परवानग्यांबाबत मोठा गैरप्रकार उघड झाल्याचा आरोप समोर आला आहे. बनावट एयर ट्रॅफिक कंट्रोल (अढउ) परवानग्यांच्या आधारे शहरातील बिबवेवाडी, सिंहगड रोड आणि आंबेगाव परिसरात अनेक उंच इमारतींना मंजुरी देण्यात आल्याची तक्रार करण्यात आली आहे. यामुळे विमान वाहतूक सुरक्षिततेसह राष्ट्रीय सुरक्षेचाही प्रश्न निर्माण झाला असल्याची चिंता व्यक्त होत आहे. तक्रारदार अनंत घरत यांनी दिलेल्या माहितीनुसार, १७ नोव्हेंबर २०२० रोजी लोहगाव येथील अढउ कार्यालयाच्या पत्रानंतर काही परवानग्या रद्द समजण्याचे निर्देश होते. तसेच, माहिती अधिकारातून मिळालेल्या माहितीनुसार काही बांधकामांना देण्यात आलेल्या उंची परवानग्या संरक्षण मंत्रालयाकडून वैध नसून बनावट असल्याचे स्पष्ट झाले आहे. गांधीनगर येथील संबंधित कार्यालयानेही काही परवानग्या खोट्या असल्याचे कळविले असल्याचा दावा करण्यात आला आहे. या प्रकरणात विकासक, आर्किटेक्ट आणि मनपाच्या बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांच्या संगनमताचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. ६ एप्रिल २०२६ रोजी महानगरपालिका आयुक्त आणि मुख्य अभियंता यांच्याकडे लेखी तक्रार देऊनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचे सांगण्यात आले. तक्रारदारांनी या प्रकरणात उच्चस्तरीय चौकशी समिती नेमण्याची, दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची, भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यानुसार कारवाई करण्याची तसेच अनधिकृत बांधकामांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच, प्रकरणी त्वरित निर्णय न झाल्यास आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे. पुणे शहरातील बांधकाम क्षेत्रातील या कथित गैरप्रकारामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, पुढील कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः गाव मौजे निरगुडसर, ता. आंबेगाव, जि. पुणे येथील लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत कासाबाई लक्ष्मण बांगर यांचे नावे सातबारा सदरी व मालकी ताबेवहिवाटीस असून सदर मिळकत संपूर्णपणे निर्वेध व निजोखमी असल्याचा भरवसा व खात्री विदयमान मालकांनी आमचे अशिल सौ. शितल अभिजीत पोखरकर यांस दिली. त्यांना सदर मिळकत विक्री करावयाचे असल्याने त्यांनी आमचे अशिलास सदर मिळकत खरेदी देण्याचे कबुल करुन त्यांचेकडून इसार स्विकारला आहे. सबब सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, बक्षिस, लीन, लीज, पोटगी, कुळ, खंड, ताबा, वहिवाट, विसार, साठेखत, विकसन करार, कुलमुखत्यार अगर अन्य कोणत्याही प्रकारचा तबदीलीचा लेखी अथवा तोंडी करार असल्यास त्यांनी नोटीस प्रसिध्द झालेपासून पंधरा दिवसांचे आत आमची मुळ कागदपत्रानिशी आमचे खालील पत्त्यावर येऊन खात्री पटवून तशी लेखी हरकत नोंदवावी मात्र मुदतीत कोणाचीही हरकत वा तक्रार न आल्यास ज्या कोणाचा हक्क हितसंबंध होता त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिला असे समजून आमचे अशील सदर मिळकतीचा खरेदीचा पुढील व्यवहार पूर्ण करतील त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार वा हरकत चालणार नाही.

परिशिष्ट- मिळकतीचे वर्णन-मिळकत तुकडी पुणे, पोटतुकडी तालुका आंबेगाव मे. सह दुय्यम निबंधक सो. आंबेगाव यांचे हद्दीतील गाव मौजे निरगुडसर येथील खाते नं. ५७४ वरील जमिन गट नं. ९२/१/अ पैकी क्षेत्र ०० हे ३०.७६ आर + पोटखराबा ००हे ०३ आर.

मंचर, दि. २०/०४/२०२६

**ॲड.आशिष पांडूरंग काजळे**
**मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे ४१० ५०३**
**मोबाईल : ९९६०२१९२१९**

# श्रीगोंद्यात एमआयडीसीच्या जागेतून मातीचा अवैध उपसा सुरूच

## प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष की राजकीय आशीर्वाद?

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बेलवंडी** : श्रीगोंदा तालुक्यातील लोणी व्यंकनाथ हद्दीत एमआयडीसीच्या जागेतून रात्रीच्या वेळी जेसीबी आणि हायवा च्या मदतीने आतापर्यंत हजारो ब्रास मातीची अवैधपणे चोरी झाली असून स्थानिक नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही संबंधित प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एमआयडीसीच्या आरक्षित भूखंडावरून रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणात माती उपसा केला जात आहे. जेसीबी व हायवाच्या साहाय्याने या मातीची इतर ठिकाणी विक्री केली जात आहे.



■ सदर माती चोरी प्रकरणी अद्याप कल्पना नाही अथवा तक्रार आलेली नाही, माहिती घेऊन कायदेशीर कारवाई केली जाईल.
**– सचिन डोंगरे, तहसीलदार, श्रीगोंदा**

■ अधिकाऱ्यांनी तातडीने मातीचा पंचनामा करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अन्यथा या मातीमाफिया आणि प्रशासन विरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा मानव विकास सेवा संस्थेचे अध्यक्ष नारायण हिरवे यांनी दिला आहे.

या प्रकारामुळे शासनाच्या मालमत्तेचे मोठे नुकसान होत आहे. विशेष म्हणजे हा प्रकार अनेक दिवसांपासून सुरू असूनही अधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते.

स्थानिक ग्रामस्थांच्या मते, अनेक वेळा प्रशासनाला कळवूनही कुठलीही कारवाई होत नाही. त्यामुळे या माती माफियांना राजकीय आश्रय आहे का, की प्रशासनच याकडे जाणूनबुजून डोळेझाक करत आहे? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

या अवैध उत्खननामुळे परिसरातील पर्यावरणीय समतोल बिघडत असून, स्थानिक शेतकरी यांना जाण्या येण्यासाठी असलेला रस्ता देखील खराब झाला आहे. जमिनीची नैसर्गिक रचना देखील बदलत आहे. तसेच शासनाच्या महसुलालाही फटका बसत आहे.

---

द•ख•ल

## पद्मश्री डॉ.देसाई राष्ट्रसेवा पुरस्कार हभप मीनाताई मडके यांना जाहीर



**शेवगाव** : समाजसेवेचा वसा घेतलेल्या महाराष्ट्रातील नामांकित महिला कीर्तनकार ह.भ.प.सौ. मीनाताई महाराज मडके यांना त्यांच्या उत्तम सामाजिक व परमार्थिक कार्याबद्दल पद्मश्री डॉ. मनिभाई देसाई राष्ट्रसेवा पुरस्कार २०२६ जाहीर. झाला आहे

पद्मश्री डॉ. मणी भाई देसाई प्रतिष्ठान क्रीडा युवक कल्याण मंत्रालय, नीती आयोग, एम एस एम इ उद्यम मंत्रालय भारत सरकार सलग्नित संस्थेच्या वतीने समर्पित भावनेने कार्य केलेल्या कार्यकत्यांना राष्ट्रसेवा पुरस्कार जाहीर झालेले आहेत. हे पुरस्कार दिनांक २७ एप्रिल२०२६ रोजी सोमवारला सायंकाळी सहा ते आठ च्या दरम्यान क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारक सभागृह येथे होणार आहेत. मॅगसेस अवॉर्ड विजेते पद्मश्री डॉ. मणी भाई देसाई यांच्या जयंती निमित्ताने विविध क्षेत्रात निरपेक्षपणे व समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना हे पुरस्कार प्रदान करण्यात येतील असे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ज्येष्ठ समाजसेवक, वृक्षमित्र ह. भ. प.डॉ रवींद्र भोळे यांनी सांगितले. या कार्यक्रमाला नामदार श्री रवींद्र साठे खादी आणि ग्रामोद्योग मंत्री स्वतंत्र कार्यभार मंत्रालय मुंबई, यांचे हस्ते पुरस्कार वितरण समारंभ होईल.

## निघोज कुंड पर्यटन क्षेत्र येथे लोकसहभागातून स्वच्छता मोहीम



**निघोज** : निघोज येथील राज्याचे जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीची मुख्य यात्रा १०,११,१२ एप्रिल रोजी पार पडली.यात्रेसाठी देशभरातुन लाखों भाविकांची उपस्थिती होती.यात्रेनंतर मळगंगा यात्रा उत्सव कमिटीचे अध्यक्ष शिवाजीराव लंके यांनी तात्काळ यात्रा कमिटीची बैठक घेऊन कुंड पर्यटन क्षेत्र येथील स्वच्छता लोकसहभागातून करण्याचे ठरविले.दोन दिवस सुरू असलेल्या स्वच्छ्ता मोहीमेमध्ये सहकारमहर्षी डि अँण्ड बी फार्मसी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून मोठ्या प्रमाणात सहकार्य केले. त्याचबरोबर मळगंगा यात्रा उत्सव कमिटी, श्री मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट, निघोज ग्रामपंचायत,शिवबा संघटना, निघोज व्यापारी असोसिएशन , पारनेर तालुका पत्रकार संघ व निघोज ग्रामस्थ हे सहभागी झाले होते.दोन दिवस चाललेल्या स्वच्छता मोहीमेमध्ये कुंड पर्यटन क्षेत्र येथील ९०% परिसर स्वच्छ करण्यात आला.पुढील वर्षी यामध्ये जास्तीत जास्त सामाजिक संघटना व महिला बचत गटांना ही समावुन घेण्याचा प्रयत्न राहील. यामुळे एकाच दिवशी सर्व स्वच्छता होईल व याचा त्रास भाविकांना होणार नाही असा विश्वास यावेळी मळगंगा यात्रा उत्सव कमिटीने व्यक्त केला.

## दध्नेश्वर शिवालयात उन्हाळी बालसंस्कार शिबिराचे आयोजन

**शहरटाकळी** : आधुनिकतेच्या जमान्यात मुलांवर होणारे संस्कार कमी पडत चालले आहेत. धावत्या युगात मुलांच्या आजी-आजोबांना, आई वडिलांना मुलांना देण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही. परिणामी शिकवण्या आणि संगणकाच्या मदतीने होणारे शिक्षण संस्कार विशेतः धार्मिक संस्कार देण्यास अपुरे पडत असल्याने उन्हाळी सुट्टीचा सदुपयोग म्हणून शेवगाव तालुक्यातील दहिगावने येथील दध्नेश्वर शिवालयात उन्हाळी बालसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती शिवालयाचे महंत सुदामदेव महाराज शास्त्री यांनी दिली. शिवालयाचे संस्थापक वैकुंठवासी कृष्णदेव महाराज काळे, वैकुंठवासी नवनाथ महाराज काळे, गुरुवर्य भास्करगिरीजी महाराज व राऊत बाबा यांच्या आशीर्वादाने रविवार दि.२६ एप्रिल ते शुक्रवार दि.१५ मे या कालावधीत विष्णू सहस्रनाम, गीतापाठ, योगासने, मृदंग व गायनाचा वर्ग, हरिपाठ पाठांतर, वेगवेगळे खेळ, संत चरित्रकथा असे वेगवेगळे विषयाला अनुसरून दिनचर्या असेल. या शिबिराला देवगड संस्थानचे गुरुवर्य भास्करगिरिजी महाराज, नेवासा येथील ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे महंत देविदास महाराज म्हस्के, सिताराम महाराज चेडे, गणपत महाराज आहेर, गोरक्ष महाराज मिरझे भेट देणार आहेत.

## प्रा.वीरेंद्र शंकर धनशेट्टी यांना विद्यावाचस्पती पदवी प्रदान

**पारनेर** : डॉ. वीरेंद्र शंकर धनशेट्टी यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथून विद्यावाचस्पती पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांच्या संशोधन कार्याला विद्यापीठाने मान्यता देत ही पदवी बहाल केली. धनशेट्टी यांनी पारनेर तालुक्यातील राजकारणाचा चिकित्सक अभ्यास : कालखंड विशेषतः १९६० ते २०१४ या विषयावर संशोधन केले. या संशोधनामध्ये पारनेर तालुक्यातील राजकीय घडामोडी, स्थानिक नेतृत्व, निवडणूक प्रक्रिया आणि सामाजिक-राजकीय बदलांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. या संशोधन कार्यासाठी त्यांना प्रा. डॉ. ज्योती पापा बीडलान यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली हे संशोधन पूर्णत्वास गेले. या उल्लेखनीय यशाबद्दल धनशेट्टी वीरेंद्र शंकर यांचे अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष मा. श्री.रामचंद्रजी दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, ज्येष्ठ विश्वस्त सितारामजी खिलारी तसेच अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सर्व पदाधिकारी यांनी केले.

---

## 'गोमातेच्या रक्षणा'तून उभा केला समाजजागृतीचा नवा मानदंड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**शेवगाव** : भारतीय संस्कृतीत गाय ही 'गोमाता' मानली जात असून तिचे संरक्षण व संगोपन करणे ही प्रत्येकाची नैतिक जबाबदारी आहे. गोसेवा हीच खरी समाजसेवा असून यामधूनच संस्कार व संवेदनशीलता जपली जाते, असे प्रतिपादन हिंदू संमेलनाचे प्रमुख वक्ते, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पूर्वप्रचारक व राष्ट्रीय कार्यकर्ते सुनीलजी देवधर यांनी केले.

शेवगाव येथील गोसेवक तथा शिवसेना युवासेना जिल्हाध्यक्ष साईनाथ आधाट हे मोठ्या प्रमाणावर देशी गायींचे संगोपन करून समाजापुढे आदर्श निर्माण करत आहेत. अत्यंत निष्ठेने व जिव्हाळ्याने ते गोसेवा करत असून त्यांच्या या कार्यातून समाजात सकारात्मक संदेश जात असल्याचे देवधर यांनी सांगितले. सध्याच्या काळात गोसंवर्धनाचे महत्त्व अधिक वाढले असून अशा कार्यकर्त्यांची समाजाला नितांत गरज असल्याचेही त्यांनी सांगितले. साईनाथ आधाट यांचा सन्मान हा शेवगावसाठी अभिमानाची बाब ठरत असून त्यांच्या कार्यामुळे अनेक युवकांना प्रेरणा मिळत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## दुय्यम निबंधक लंगोटे यांना निलंबित करा

### वडार समाजाचे अध्यक्ष धनवडे यांची निवेदनाद्वारे मुख्यमंत्र्यांकडे मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव** : शेवगाव येथील दुहेरी निबंध यांच्या विरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा व भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून त्यांना ताबडतोब निलंबित करण्याची मागणी शेवगाव तालुका वडार समाजाचे अध्यक्ष अशोकराव धनवडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदनाद्वारे केली आहे. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शेवगाव येथील दुय्यम निबंधक डी.डी लंगोटे हे आपल्या पदाचा गैरवापर करून शासकीय महसुलाचे नुकसान करीत असून सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक पिळवणूक करत आहेत. शासनाची फसवणूक करून ४२ ब ४२ ड असे भरपूर तुकड्यांचे व्यवहार झाले आहेत. तसेच ते दस्त नोंदणीसाठी येणाऱ्या पक्षकारांकडे स्वतः चा शिक्षणाचा खर्च वसूल करायचा आहे असे सांगून उघड पैशांची मागणी करतात. शासकीय नियमानुसार शेती जमिनीच्या तुकड्यांची नोंदणी करण्यास बंदी असतानाही केवळ आर्थिक लाभ घेऊन सदर अधिकारी अवैधपणे दस्त नोंदवत आहेत, हे भारतीय न्याय संहिता कलम ३१८ आणि कलम ३३६ अंतर्गत शिक्षा पात्र आहे. फॉरेस्ट जमिनी, इनामी जमिनी आणि शासकीय निर्बंध असलेल्या जमिनीचे व्यवहार करताना जाणीवपूर्वक जमिनीचे मूल्यांकन कमी दाखवून त्याच्यात मोठा भ्रष्टाचार सध्या शेवगाव दुय्यम निबंधकाद्वारे चालू असल्याचा आरोपही धनवडे यांनी केला आहे. त्याबाबत त्यांना जर कोणी विचारले तर सदर अधिकारी मी आयजीआर,डीआयजी आणि जीडीआर यांना पाकीट पोचवतो माझे कोणीही काही वाकडे करू शकत नाही अशी विधाने करून वरिष्ठ कार्यालयाची प्रतिमा जनमानसात मलीन करीत आहेत अशा अधिकाऱ्यावर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याची दखल घेऊन दोन महिन्यांच्या आत दुय्यम निबंधकावर कारवाई करावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. कारवाई झाली नाही तर सहकाऱ्यांसह आझाद मैदान मुंबई येथे आमरण उपोषण करण्याचा इशाराही धनवडे यांनी निवेदनातून दिला आहे.

## नारायणगव्हाणच्या चुंबळेश्वर देवस्थानला नवी ओळख

### ४० लाखांच्या कीर्तन मंडपाचे भूमिपूजन उत्साहात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पारनेर** : सोमवार दि. २० एप्रिल २०२६ रोजी नारायणगव्हाण येथील श्री क्षेत्र चुंबळेश्वर महादेव मंदिर परिसराच्या सर्वांगीण विकासाला गती देणारा महत्त्वपूर्ण उपक्रम आज पार पडला. पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नातून पर्यटन विकास निधीतून मंजूर झालेल्या सुमारे ४० लाख रुपये खर्चाच्या भव्य कीर्तन मंडप बांधकामाचे भूमिपूजन विधीवत संपन्न झाले.

या मंडपामुळे मंदिर परिसरात धार्मिक कार्यक्रम, कीर्तन- भजन, प्रवचन यांसाठी सुयोग्य व सुसज्ज व्यवस्था निर्माण होणार असून, भाविकांना अधिक सोयीस्कर आणि व्यवस्थित सुविधा उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे या ठिकाणच्या धार्मिक आणि सांस्कृतिक उपक्रमांना नवे बळ मिळणार आहे.

या प्रसंगी सुनील थोरात, बाळासो कळमकर, सुरेश बोरुडे सर, संतोष गायकवाड, खिवंसरा काका,



सहादू शेळके, बंडोपंत नाईक, तारा दरेकर, संजय शेळके, दादासाहेब शेळके, विकास पवार, हुसेन शेख, गणेश शेळके, हेमंत कांडेकर, सौ. मनीषा जाधव, सविता भोसले, श्रीमती अनुसया कांडेकर, अण्णा चव्हाण, बाळासाहेब चव्हाण, भरत भोसले, मेजर काशिनाथ नवले, प्रताप अंबुले, सौ. उषा संजय शेळके, सौ. कामिना विकास पवार आदी मान्यवर तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आमदार काशिनाथ दाते सर म्हणाले आपल्या तालुक्यातील देवस्थानांचा विकास हा केवळ श्रद्धेचा भाग नसून, तो ग्रामीण भागाच्या प्रगतीशी थेट जोडलेला आहे. चुंबळेश्वर मंदिरासारख्या ठिकाणांचा विकास केल्यास येथे येणाऱ्या भाविकांची संख्या वाढेल, स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील आणि गावाच्या आर्थिक व सामाजिक विकासाला चालना मिळेल. पर्यटन विकासाच्या माध्यमातून आपल्या भागातील परंपरा आणि संस्कृती जतन करत विकास साधण्याचा आमचा प्रयत्न कायम राहील.

> आमदार काशिनाथ दाते सरांनी नारायणगव्हाणसारख्या ग्रामीण भागातील देवस्थानाच्या विकासासाठी घेतलेली पुढाकार खरोखर कौतुकास्पद आहे. चुंबळेश्वर मंदिरासाठी कीर्तन मंडप उभारणीमुळे भाविकांना मोठी सुविधा मिळणार आहे. सरांनी केवळ आश्वासने न देता प्रत्यक्ष कामातून विकास घडवून आणला आहे, याचे समाधान वाटते. त्यांच्या या कामामुळे गावाच्या धार्मिक व पर्यटनदृष्ट्या प्रगतीला नक्कीच चालना मिळेल. पुढील काळातही अशाच पद्धतीने विकासकामे सुरू राहतील, असा विश्वास आहे.
> **– सुरेश बोरुडे,माजी सरपंच, नारायणगव्हाण**

## घोड धरणाच्या पाण्यावरून संघर्ष पेटणार

### २५ एप्रिलला महामार्गावर 'रस्ता रोको'चा इशारा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**श्रीगोंदा** : घोड धरणातील पाण्याच्या वापराबाबत स्थानिक शेतकऱ्यांचा संताप उफाळून आला असून, साकळाई उपसा सिंचन योजनेला पाणी देण्याच्या निर्णयाविरोधात तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. प्रशासनाने तातडीने दखल न घेतल्यास २५ एप्रिल रोजी नगर-दौंड राष्ट्रीय महामार्गावर 'रस्ता रोको' आंदोलन छेडण्यात येणार असल्याचे निवेदनातून स्पष्ट करण्यात आले आहे.

तालुक्यातील घोड लाभक्षेत्रात येणाऱ्या गावातील अनेक शेतकऱ्यांनी एकत्रित येत तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, घोड धरणातील उपलब्ध पाणीसाठा आधीच अपुरा आहे. त्यातून काष्ठी गावची पाणीपुवठा योजना श्रीगोंदा शहरातील पाणी पुरवठा आगोदरच चालू आहेत त्यामुळे जलसाठा दिवसेंदिवस घटत चालला आहे अशा परिस्थितीत बाहेरील योजनांसाठी पाणी वळवले, तर स्थानिक शेती, पिकांचे उत्पादन आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.आधी लाभक्षेत्र, मग बाहेरचं ही भूमिका घेत शेतकऱ्यांनी स्पष्ट इशारा दिला आहे. घोड परिसरातील हजारो हेक्टर शेती या धरणावर अवलंबून असून, उपसा सिंचन योजनेस पाणी दिल्यास भविष्यात दुष्काळसदृश परिस्थिती निमाण होऊ शकते, असा ठाम दावा करण्यात आला आहे. शासन आणि प्रशासनाने या योजनेचा फेरविचार करावा, अन्यथा आंदोलनाची तीव्रता वाढवली जाईल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.दरम्यान, पाणी आमचं, हक्क आमचा; निर्णय मात्र कुणाचा? असा सवाल करत शेतकरी संघटनांनी आंदोलनाची तयारी सुरू केली आहे.

आता प्रशासन वेळेत जागं होतं का, की रस्त्यावरचा एल्गार ऐकावा लागतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. अश्या आशयाचे निवेदन घोड बचाव कृती समितीच्या वतीने तहसीलदार याना देण्यात आले आहे

## आ.काशिनाथ दातेंच्या नेतृत्वावर विश्वास

### अळकुटीतील अनेक कार्यकर्त्यांनी केला राष्ट्रवादीत प्रवेश



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पारनेर** : सोमवार दि. २० एप्रिल २०२६ पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघात आमदार काशिनाथ दाते सर यांच्या विकासाभिमुख कार्यशैलीवर आणि सर्वसामान्यांशी असलेल्या जिव्हाळ्याच्या नात्यावर विश्वास ठेवत कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडे ओढा सातत्याने वाढत असल्याचे चित्र अळकुटी येथे पुन्हा एकदा नव्याने पाहायला मिळाले.अळकुटी येथील परंडवाल मळ्यातील कार्यकर्त्यांनी आज आमदार दाते सर यांच्या प्रमुख उपस्थितीत पारनेर येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला.

यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य वसंतराव चेडे प्रमुख उपस्थिती होते, पारनेर राष्ट्रवादी महिला कॉंग्रेसच्या उपाध्यक्षा रेश्मा गलांडे व मच्छिंद्र गलांडे यांच्या मार्गदर्शना खाली सुरेश काशिनाथ परंडवाल, सचिन कोडीभाऊ परंडवाल, तुकाराम सिताराम परंडवाल, जयराम शिवराम परंडवाल, प्रविण काशिनाथ परंडवाल, सुयश सुरेश परंडवाल यांनी पक्षाचा झेंडा हाती घेतला. या सर्वांनी आमदार दाते सरांच्या कार्यपद्धतीवर विश्वास व्यक्त करत विकासाच्या वाटचालीत सहभागी होण्याचा निर्धार व्यक्त केला.

## अहिल्यानगरची वाटचाल आता आधुनिक वैद्यकीय सेवेकडे : डॉ.विखे

### ही केवळ हॉस्पिटलची नव्हे, तर शहराच्या प्रगतीची सुरुवात : आ.जगताप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर** : अहिल्यानगर शहरातील साताळकर लोटस रुग्णालयात अत्याधुनिक रोबोटिक शस्त्रक्रिया प्रणाली सुरू होत शहराच्या आरोग्य क्षेत्रात नवा ठसा उमटवला आहे. रोबोटच्या सहाय्याने शस्त्रक्रिया करणारी सुविधा उपलब्ध करून देणारे हे शहरातील पहिलेच रुग्णालय ठरले असून, त्यामुळे जिल्ह्यातील रुग्णांना आता उच्च दर्जाची वैद्यकीय सेवा स्थानिक पातळीवरच मिळणार आहे.

अक्षय तृतीयाच्या शुभ मुहूर्तावर पार पडलेल्या या भव्य उद्घाटन सोहळ्यास भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, नगर शहराचे आमदार संग्राम भैय्या जगताप, हरिभक्त परायण आदिनाथ महाराज शास्त्री, ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. सातारकर, तसेच रुग्णालयातील सर्व डॉक्टर, वैद्यकीय कर्मचारी आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी बोलताना डॉ. सुजय विखे पाटील यांनी सांगितले की, अहिल्यानगरसारख्या शहरात रोबोटिक शस्त्रक्रिया प्रणाली सुरू होणे ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. यामुळे रुग्णांना मोठ्या शहरांमध्ये जाऊन उपचार घेण्याची गरज कमी होणार असून, वेळ, पैसा आणि श्रम यांची बचत होणार आहे.

साताळकर लोटस रुग्णालयाने आधुनिक वैद्यकीय सेवेत नवा मापदंड निर्माण केला असून, ही सुविधा भविष्यातील आरोग्यसेवेचा एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

यावेळी आमदार संग्राम जगताप यांनी आपल्या भाषणात नमूद केले की, ही सुविधा केवळ एका रुग्णालयापुरती मर्यादित नसून, संपूर्ण शहराच्या प्रगतीचे प्रतीक आहे. अशा अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे नागरिकांना दर्जेदार आणि सुरक्षित उपचार सेवा आपल्या शहरातच उपलब्ध होत आहे, ही निश्चितच अभिमानाची बाब आहे.

कार्यक्रमात डॉ. तनवर यांनी रोबोटिक शस्त्रक्रियेबाबत सविस्तर माहिती देताना सांगितले की, रोबोट हा डॉक्टरचा पर्याय नसून एक अत्याधुनिक सहाय्यक आहे. डॉक्टरच्या नियंत्रणाखाली तो अधिक अचूक, स्थिर आणि सूक्ष्म हालचाली करतो, ज्यामुळे शस्त्रक्रिया अधिक सुरक्षित आणि प्रभावी होते. यामुळे रुग्णांना कमी वेदना होतात, रक्तस्राव कमी होतो आणि रुग्ण लवकर बरे होतात, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या प्रसंगी डॉ. सतीश सोनवणे यांना विशेष सन्मानाने गौरविण्यात आले. तसेच महिला बालकल्याण समितीच्या उपसभापती सानप मॅडम, नगरसेवक निखिल वारे, महेश लोंढे, विविध मान्यवर, डॉक्टर, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## यात्रेनिमित्त महादेव पिंडीची आकर्षक सजावट

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान** : येथील गावचे आराध्य दैवत श्री शंभू महादेव यात्रोत्सवानिमित्त श्री शंभू महादेव पिंडीची आकर्षक सजावट करण्यात आली आहे.ती दर्शनासाठी आलेल्या भाविकांना आकर्षित व मोहित करत आहे. यासाठी पिंडीची आकर्षक सजावट करणारे शिवभक्त विजय नारळे या सजावटीसाठी सेवा देत आहेत. त्यांचे समस्त ग्रामस्थ व शिवभक्तांनी आभार व्यक्त केले आहे.



# अँड. संजय सुखदान यांच्यावरील कथित गुन्ह्याविरोधात सर्व पक्षीय एल्गार

## गाव बंद, निष्पक्ष चौकशीची मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : शहरातील सामाजिक कार्यकर्ते अँड. संजय सुखदान यांच्यावर दाखल करण्यात आलेल्या कथित खोट्या गुन्ह्याविरोधात नेवासा शहरात सर्वपक्षीयांनी एकत्र येत सोमवारी तीव्र आंदोलन छेडले. नगरपंचायतीच्या कथित अवैध कारभाराच्या विरोधात सुखदान यांनी घेतलेल्या आक्रमक भूमिकेमुळेच त्यांच्यावर दबाव आणण्यासाठी हा गुन्हा दाखल करण्यात आल्याचा आरोप आंदोलकांनी मोर्चा प्रसंगी बोलतांना केला. पाणीपुरवठा व स्वच्छता यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर खर्च दाखवलेल्या रकमेतील व प्रत्यक्ष कामातील तफावत उघड केल्याने अँड. संजय सुखदान यांनी मुख्याधिकाऱ्यांवर थेट आरोप करत कारवाईची मागणी केली होती. याच पार्श्वभूमीवर त्यांच्यावर गोळीबार केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

मात्र संबंधित घटना नेवासा बसस्थानक परिसरात घडल्याचे फिर्यादीत नमूद असताना ही नेवासा शहरातील कोणत्याही नागरिकाने ती पाहिली नसल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे पोलीस स्टेशनच्या अगदी जवळ घटना घडल्याचा दावा असून ही पोलिसांना त्याची माहिती कशी मिळाली नाही, तसेच घटना १३ एप्रिलची असताना फिर्याद १८ एप्रिल रोजी अहिल्यानगर येथील तोफखाना पोलीस स्टेशनमध्ये का दाखल करण्यात आली याबाबत अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले. याच्या निषेधार्थ नेवासा शहर पूर्णपणे बंद ठेवत नागरिक, महिला, युवक मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी झाले होते. विविध पक्षांचे पदाधिकारी व स्थानिक नेत्यांनी आपल्या भाषणातून या प्रकरणाचा तीव्र निषेध नोंदवला.

यावेळी नेवासा बाजार समितीचे सभापती नंदकुमार पाटील, आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र आघाव, उपनगराध्यक्षा शालिनीताई संजय सुखदान, भाजपचे शहराध्यक्ष मनोज पारखे,भाजपचे नगरसेवक निरंजन डहाळे,काँग्रेसचे तालुकाध्यक्ष आण्णासाहेब पटारे, व्यापारी संघटनेचे कुणाल मांडण,युवा नेते गणेश चौगुले, सामाजिक कार्यकर्ते शांताराम गायके,आरपीआयचे संजय बनसोडे,नगरसेवक स्वप्नील मापारी,संतोष राजगिरे, येडुभाऊ सोनवणे यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी झालेल्या निषेध मोर्चात नेवासा नगरपंचायत नगरसेवक,विविध पक्षाचे पदाधिकारी, महिला तरुण भर उन्हात मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपनगराध्यक्षा शालिनीताई संजय सुखदान या महिलांसह या आंदोलनात राष्ट्रध्वज तिरंगा घेऊन मोर्चात सहभागी झाल्या होत्या.

मोर्चानंतर तहसीलदार संजय बिरादार व पोलीस निरीक्षक महेश पाटील यांना निवेदन देण्यात आले. अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून सत्य बाहेर काढण्याचे आश्वासन दिले तसेच आंदोलन मागे घेण्याची विनंती केली.दरम्यान लवकरात लवकर संबंधित गुन्हा मागे घेऊन दोषींवर कारवाई न झाल्यास आणखी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी आंदोलकांनी दिला आहे.



> १३ एप्रिल रोजी सायंकाळी नेवासा पोलीस स्टेशनपासून जवळच गोळीबार झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.नेवासा पोलिसांना त्याची माहिती का मिळाली नाही?तसेच घटना नेवाशात घडल्याचे सांगितले असताना फिर्याद पाच दिवसांनी अहिल्यानगर येथे का दाखल करण्यात आली? या प्रश्नांमुळे प्रकरण अधिकच संशयास्पद ठरत आहे.

# वन विभागाच्या कार्यालयातून चंदन चोरी;

## कर्मचाऱ्याला झाडाला बांधले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : शहरातील वन विभागाच्या मुख्य कार्यालय परिसरातून चंदनाची चोरी झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. शनिवारी (दि. १८ एप्रिल) पहाटे घडलेल्या या प्रकारात कर्मचाऱ्याला बेदम मारहाण करून झाडाला बांधण्यात आले, तर सुमारे २० हजार रुपयांची चंदनाची लाकडे चोरट्यांनी लंपास केली.

या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रमेश पोपट शेळके (वय ५८, रा. गुंडेगाव, ता. अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. ते वन विभागाच्या कार्यालयात रखवालदार म्हणून कार्यरत असून घटनेच्या वेळी ते ड्युटीवर होते. माहितीनुसार, पहाटे दोनच्या सुमारास चार अनोळखी व्यक्तींनी कार्यालय परिसरात प्रवेश केला.

त्यांनी शेळके यांना पकडून हाताने व चापट्यांनी मारहाण करत धमकावले. त्यानंतर त्यांना झाडाला घट्ट बांधून ठेवण्यात आले, जेणेकरून ते प्रतिकार करू शकणार नाहीत. यानंतर आरोपींनी परिसरातील चंदनाची झाडे तोडून त्यांची लाकडे चोरून नेली. घटनेनंतर पोलिसांनी तत्काळ गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक योगेश पवार करत असून, आरोपींचा शोध घेण्याचे काम सुरू आहे.






# वाहन नूतनीकरण २०२६ पर्यंत मुदतवाढ

## १५ लाख वाहनधारकांना दिलासा

शफीक बागवान | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालयाने वाहन नूतनीकरण प्रक्रियेला ऑक्टोबर २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे राज्यातील सुमारे १५ लाख व्यावसायिक वाहनधारकांना दिलासा मिळाला आहे. रिक्षा, टेम्पो तसेच इतर व्यावसायिक वाहनांच्या तंदुरुस्ती तपासणी करण्याचे काम गेल्या काही महिन्यांपासून रखडले होते. केंद्र सरकारने रस्ते सुरक्षा अधिक कडक करण्यासाठी व्यावसायिक वाहनांच्या तंदुरुस्ती तपासणीसाठी 'ऑटोमॅटिक टेस्टिंग स्टेशन' (एटीएस) प्रणाली अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला. मात्र, राज्यातील अनेक प्रादेशिक परिवहन कार्यालयांमध्ये (आरटीओ) ही यंत्रणा अद्याप सक्षमपणे कार्यरत झालेली नाही. त्यामुळे राज्यातील ११ प्रमुख आरटीओ क्षेत्रांतील सुमारे १५ लाख व्यावसायिक वाहनांच्या नूतनीकरणाचे काम ठप्प झाले होते. परिणामी, रिक्षाचालकांपासून मालवाहतूकदारांपर्यंत उदरनिर्वाहाचे संकट उभे राहिले होते. महाराष्ट्रातील ११ आरटीओ क्षेत्रात केंद्र सरकारच्या रस्ते विकास आणि वाहतूक मंत्रालयाने एटीएस प्रणाली सक्तीची केल्याने अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. वाहनांचे तंदुरुस्ती प्रमाणपत्र (फिटनेस सर्टिफिकेट) मिळत नसल्याने रिक्षा, टेम्पो तसेच इतर लहान वाहनाद्वारे व्यवसाय करणारे छोटे व्यवसाय हवालदिल झाले होते.

# लग्नात मानपान न मिळाल्याने विवाहितेचा छळ : सहा जणांवर गुन्हा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : अवघ्या सहा महिन्यांपूर्वी विवाह झालेल्या नव विवाहितेस पतीकडून छळ व अमानुष वागणूक दिल्याने पतीसह सहा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे . शिर्डी येथे १६ मे २०२५ रोजी मोठ्या थाटामाटात लग्न झालेल्या विवाहितेला पती अक्षय अशोकराव निर्मळ वय २९ रा . पिंपरी निर्मळ ता राहता ह . मू वाळुंज औरंगाबाद हा लग्न झाल्यापासून विवाहिता सासरी नांदण्यासाठी आली असता एक महिन्यातील कालावधीत चांगला संसार केला मात्र त्यानंतर काही दिवसातच पती आई वडील व त्याची बहीण भाऊ यांनी विवाहितेला लग्नात मानपान मिळाला नाही . चांगले लग्न करून दिले नाही दोन तोळे सोने घातले नाही तुझे वडील काही कामाचे नाही असे म्हणत टोमणे मारत वेळोवेळी मोठा त्रास देऊ लागले या काळात मानसिक त्रास व प्रसंगी मारहाण देखील करत होते त्रास सहन करत विहिता सुखाचा संसार होईल अशा आशेवर होती त्रास दिला जात असताना घरात किराणा व इतर आवश्यक गरजांसाठी खर्च पाणी देखील त्यासाठी पैसे दिले जात नव्हते. सदर खर्च विवाहित महीलेची गरिब आई करत होती. मला व्यवसायासाठी पाच लाख रुपये तुझ्या आई कडून आणून दे असे म्हणत मानसिक शारीरिक आर्थिक भावनिक त्रास देखील मोठ्या प्रमाणात देत होता .चारित्र्यावर संशय घेऊन अनेक कारणावरून वेळोवेळी मानसिक शारीरिक कारणावरून देखील मारहाण करत होता. माझे लग्न बळजबरीने करून दिले आहे असे तो सांगत असे त्यासाठी विवाहितेने या नात्याने वेळोवेळी विरोध देखील केला मात्र तो कमवलेला सर्व पैसे आपल्या व्यसनावर खर्च करत होता आज ना उद्या संसार चांगला होईल अशी अपेक्षा असताना तशी मात्र घडत नव्हते होणारा त्रास मोठ्या प्रमाणावर वाढतच होता. दि २६ सप्टेंबर २०२५ रोजी सदर विवाहितेला राहत्या घरातून बाहेर हाकलून दिले आहे.






# कंत्राटी कर्मचाऱ्यांची व्यथा मांडल्याने शिक्षकाला नोटीस

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : साईबाबा संस्थानच्या शैक्षणिक संकुलामध्ये कार्यरत असलेले कायम कर्मचारी तथा शिक्षक अजिंक्यदेव गायकवाड यांनी कंत्राटी कर्मचाऱ्यांची व्यथा मांडणारी कविता केल्याने त्यांच्यावर कार्यकारी अधिकारी गाडीलकर यांनी नोटीस पाठवली आहे. याबाबत संस्थांनचे शिक्षक अजिंक्य गायकवाड यांनी काय केला गुन्हा मी....अशी कविता ऐकवून कंत्राटी कर्मचाऱ्यांची मने जिंकली होती. या त्यांच्या कवितेला संस्थांनच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी भरभरून साथ दिली. परंतु गायकवाड यांनी मांडलेली कर्मचाऱ्यांची व्यथा ही काही ठराविक अधिकाऱ्यांच्या पचनी न पडल्याने कार्यकारी अधिकारी गोरक्षनाथ गाडीलकर यांनी सदर शिक्षकास तुम्ही संस्थांचे कर्मचारी आहात तुम्ही असे कृत्य करू शकत नाही. सदर नोटीस मध्ये म्हटले आहे की, काही दिवसांपूर्वी प्रसारमाध्यम तसेच श्री साईबाबा संस्थान कर्मचारी यांचे विविध व्हॅटसअप ग्रुप, यु-टुब चॅनल व लोकल वृत्तवाहिनीवर प्रसिध्द झालेल्या बातमीमध्ये कंत्राटी कर्मचारी यांचेबाबत तुम्ही, असा काय गुन्हा मी केला.. अपेक्षा होती कायम होण्याची पण कंत्राटीतच जीव गेला.. ही कविता प्रसिध्द केलेली आहे. सदर कविता प्रसिध्द करणेपूर्वी आपण या विषयाची कोणतीही शहानिशा केलेली नसून त्यामुळे प्रशासनाची प्रतिमा मलीन होत असून कर्मचाऱ्यांमध्ये चुकीचा संदेश जात आहे. संस्थानचे कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम होणे विषयी तदर्थ समितीचे सभेमध्ये वेळोवेळी झालेल्या निर्णयांनुसार व उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे निर्देशांनुसार प्रशासकीय स्तरावर आवश्यक ती पुर्तता करुन विषय उच्च न्यायालयाचे मान्यतेस्तव सादर करणेत आलेला असून याबाबत प्रशासन प्रकरणाचा वेळोचेवेळी आढावा घेत आहे.

सदर प्रकरण संस्थान स्तरावर प्रलंबीत नसून न्यायप्रविष्ठ आहे. तथापी, याबाबत आपण कुठलीही शहानिशा न करता प्रसारमाध्यांमध्ये वरील आशयाची कविता प्रसिध्द केलेली आहे. यावरुन तुम्ही श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम २०१३ कलम ३ (१) व १५ (१) चे उल्लंघन केले असल्याची नोटीस पाठवण्यात आली आहे.

दरम्यान शिक्षक गायकवाड हे या कवितेमुळे चांगलेच अडचण झाले असून त्यांनी आपली भूमिका मांडत अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा असल्याची भूमिका मांडली आहे. पुढील काळात संस्थान त्यांच्यावर काय क्शन घेते हे पाहणे औचित्याचे ठरणार आहे.











